वर्ष ४५
अंक १

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

जानेवारी २०२५
पौष/माघ
शके १९४६



नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम, माझी पत्नी निवी आणि माझ्याकडून, तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

म्हणता म्हणता २०२४ सरले आणि २०२५ चे आगमन झाले. बऱ्याच मंडळांमध्ये नवीन कार्यकारिणी स्थापन होत आहे. नवीन विचार, नवीन नेतृत्व आणि नवा उत्साह - नव्याने नियुक्त झालेल्या सर्व मंडळ अध्यक्षांचे तसेच त्यांच्या कार्यकारिणीचे अभिनंदन आणि त्यांना या वर्षभरातील कार्यक्रमांसाठी शुभेच्छा! त्याचबरोबर निवृत्त होणाऱ्या सर्व मंडळ अध्यक्ष तसेच त्यांच्या कार्यकारणीचे अभिनंदन. आपण सर्वांनी गेल्या वर्षभर किंवा त्याहूनही अधिक काळ नि:स्वार्थ भावनेने समाजसेवा केलीत, आपल्या मंडळातील मंडळींना एकत्र आणून वेगवेगळे सण साजरे केलेत, तसेच नवीन पिढीला आपली भाषा आणि संस्कृतीची ओळख करून दिलीत - त्याबद्दल खूप खूप धन्यवाद ! आता नवीन कार्यकारिणी हेच कार्य असेच चालू ठेवेल आणि पुढील पिढीला हा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी प्रवृत्त करेल यात कोणतीही शंका नाही.

पुढील पिढीबद्दल बोलायचं झाले तर मला कोणकोणत्या मंडळांनी इकडे जन्माला आलेल्या किंवा वाढणाऱ्या मुलांना कार्यकारिणीवर काम करण्याची किंवा एखादे जबाबदारीचे पद भूषवण्याची संधी दिली आहे याबद्दलची माहिती गोळा करून ती जाहीर करायला आवडेल. ही माहिती इतर मंडळांसाठी नक्कीच उपयुक्त ठरेल, तसेच त्यांना त्यांच्या मंडळातील युवाशक्तीला समितीमध्ये सामावून घेण्यासाठी हे एक उत्तम उदाहरण असेल.

'समाजरंग' हा एक नवा उपक्रम आमच्या समितीने गेल्या वर्षीच्या शेवटी सुरू केला. सामाजिक कार्याविषयी मंडळांमध्ये जागृती निर्माण करणे आणि संघटित होऊन काहीतरी समाजसेवा करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमाअंतर्गत मंडळे समविचारी मंडळींना एकत्र जमवून स्थानिक किंवा भारतातील प्रकल्पांसाठी निधी संकलन करू शकतात किंवा आपल्या कौशल्याचा वापर करून इतरांना प्रशिक्षण देऊ शकतात किंवा इतरांना समाजकार्यामध्ये सामील होण्यासाठी प्रवृत्त करू शकतात.

युवा मंडळींना एकत्र आणून स्थानिक ठिकाणी स्वयंसेवा करण्याची उत्तम संधी मंडळ आपल्या सभासदांना उपलब्ध करून देऊ शकते. जर तुमच्या मंडळाने President's Volunteer Service Award (PVSA) साठी अर्ज केला असेल आणि त्यांना मंजुरी मिळाली असेल तर तुमच्या मंडळातील अमेरिकन राष्ट्रीयत्व असणाऱ्या तसेच ग्रीन कार्ड धारकांना अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची सही असलेले प्रशस्तीपत्रक आणि पदक मिळू शकते. बारा ते अठरा वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी समाजसेवेची ही एक उत्तम संधी आहे. या संदर्भातील अधिक माहिती बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर दिलेली आहे. तरी मी मंडळाच्या सर्व अध्यक्षांना विनंती करेन की त्यांनी या संदर्भात अधिक माहिती घेऊन आपल्या मंडळात याविषयी जनजागृती करावी.

जाता जाता बृहन्महाराष्ट्र मंडळातील इतर उपक्रमांचा थोडक्यात आढावा घेऊया: रेशीमगाठी संकेतस्थळाचे नूतनीकरणाचे काम जोरात चालू आहे. या महिन्याअखेरीपर्यंत काम पूर्णत्वाला नेण्याचा आमचा मानस आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे ॲप आम्ही विकसित करत आहोत, त्यात इतर मंडळांना पण त्यांचे ॲप समाविष्ट करून घेता येईल.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळ नूतनीकरणाचे काम आम्ही पुण्यातील 'विद्यार्थी सहाय्यक समितीला' दिले आहे. ही एक ना-नफा तत्वावर चालणारी 'सामाजिक संस्था' असून, महाराष्ट्रातील खेड्यातून शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहण्याची व्यवस्था करते, तसेच 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत त्यांना प्रशिक्षण देते. या संस्थेचे विद्यार्थी आपल्या संकेतस्थळाचे आता नूतनीकरण करणार आहेत. माझ्या या प्रस्तावाला मान्यता दिल्याबद्दल माझ्या समितीतील सर्वांचे मनःपूर्वक आभार!

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सिॲटल अधिवेशनाची तयारी जोरात चालू आहे. नुकतेच संमेलनाचे संयोजक श्री. मोहित चिटणीस भारताचा दौरा करून परत आले. भारतात असताना त्यांनी अनेक कलाकार, तसेच प्रायोजकांशी संवाद साधला.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचा मैत्री मेळावा यावर्षी दोन ठिकाणी होणार आहे: यातील पहिला मेळावा डॅलस येथे १९-२० एप्रिल रोजी होणार आहे, तर दुसरा मेळावा क्लीव्हलँड येथे १३-१५ जून रोजी होणार आहे. डॅलस मैत्री मेळाव्यात त्यांच्या मंडळाव्यतिरिक्त ऑस्टिन, सॅन अँटोनियो, आणि ह्युस्टन मंडळांचा सहभाग असेल, तर क्लीव्हलँड येथील मैत्री मेळाव्यात त्यांच्या मंडळाव्यतिरिक्त पिट्सबर्ग, कोलंबस, त्रिवेणी मित्र मंडळ आणि बफेलो मंडळांचा सहभाग असेल.

या मैत्री मेळाव्यात भाग घेणाऱ्या मंडळातील मंडळींचे कार्यक्रम, बृहन्महाराष्ट्र मंडळातील उपक्रमांचे मेळावे, तसेच एखाद-दुसरा भारतातून आलेला मनोरंजनाचा कार्यक्रम असे या मेळाव्यांचे वैशिष्ट्य असेल.

परत एकदा तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा आणि हे नूतन वर्ष तुम्हा सर्वांना सुख समृद्धीचे आणि भरभराटीचे जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना! जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| श्रद्धांजली: जगदीश वासुदेव | ३ |
| वृत्ताबद्दल - वृत्त | ४ |
| ‘द ग्रेट’ भेट | ५ |
| समाजरंग | ५ |
| BMM Initiative Highlights | ६ |
| BMM मराठी शाळा किल्ला स्पर्धा | ८ |
| बृ. म. मंडळाचा मराठी शाळा उपक्रम | १० |
| पाककृती: आरोग्यम् धनसंपदा | ११ |
| वारसा | १२ |
| कविता: नवीन वर्षाच्या शुभेच्छा! | १२ |
| २०२४चा आढावा AIच्या दृष्टिकोनातून | १३ |
| मकर-संक्रांत | १४ |
| कविता: इंद्रधनुचा मार्ग | १६ |
| अमूर्त | १७ |
| कविता: मिसळ आणि पाऊस | १८ |
| या वर्षी तरी मिळवणारच ! | १८ |
| पुस्तक परिचय | १९ |
| कविता: आताशा..चैनच पडत नाही.... | २१ |
| भगवद्गीता - अनमोल तत्वज्ञान | २१ |
| कविता: तिळगुळाची संक्रांत | २२ |
| MANA Paintings | २३ |
| BMM Town Hall Meeting #2 | २४ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## जगदीश वासुदेव - अमेरिकेतील मराठी जनतेचा एक आधारस्तंभ




५ नोव्हेंबर २०२४ - एक अतिशय आदरणीय आणि अविस्मरणीय अस व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले! जगदीश वासुदेव... न्यू जर्सीच्या मराठी विश्वाचा आधारस्तंभ, अतिशय लाडका आणि सर्वांना उत्साह देणारा नेता स्मृतीभंशाशी निगडीत आजाराशी झुंज देत असतानाच आम्हाला कायमचा निरोप देऊन निघून गेला! अशा या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या जाण्याने मराठी विश्वात एक कधीही न भरुन निघणारी अशी पोकळी निर्माण झाली आहे! त्यांच्याबद्दल आणि विशेषतः एकूणच त्यांच्या कार्याबद्दल लिहायला शब्द तोकडे पडतात!

संपूर्ण मराठी जगाचा जगन्मित्र! सर्वांना सतत एकत्र आणून त्यांच्या भल्यासाठी वाहून घेतलेला असा हा नेता व कार्यकर्ता! बृहन्महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष, मराठी विश्व न्यू जर्सीच्या कार्यकारणीचे सदस्य - म्हणूनच ते निव्वळ सर्वपरिचित नव्हते. सतत जवळच्यांना एक भक्कम आधार देणे, दूरदृष्टी ठेऊन सर्व जवळच्यांना एकत्र बांधून ठेवणे आणि त्यांच्या हितासाठी अविरत झटणे हे त्यांचे विशेष व्यक्तिगत गुण होते! त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच मराठी विश्व आणि क्लब 55 हे एकत्र येऊन MV Club55 स्थापित करू शकले! त्यांचा विशेष गुण म्हणजे, अतिशय निरपेक्ष भावनेने सर्वांना जमेल तितकी मदत करणे! अडचणीच्या प्रसंगी, पुढे काय? हा प्रश्न आलेल्याला आर्थिक, शारीरिक अथवा मानसिक अशी जी शक्य असेल ती मदत करणे! त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात ते एक यशस्वी चार्टर्ड अकाउंटंट होते! त्यामुळे त्याही क्षेत्रातील त्यांना असणारी माहिती इतरांना पुरवणे हे तर ते आयुष्यभर करत आले! या सर्व गोष्टीत त्यांच्या पत्नी मोना यांचा सिंहाचा वाटा मानला पाहिजे!

९/११ ला ज्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते अशा दोन तरुणींना मदत करण्याची त्यांची भूमिका, हे त्यांच्या करुणेचे एक उज्ज्वल उदाहरण आहे. नुकतेच लग्न होऊन अमेरिकेत आलेल्या या दोन महिलांनी ९/११ च्या अतिरेकी हल्ल्यात आपले पती गमावले. जगदीशजी आणि मोनाताईंनी या महिलांना सरकारकडून आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचे अत्यंत कठीण काम केले. पण याही पलीकडे जाऊन, जे काही प्रेम, जो काही भावनिक आधार या दोघींना वासुदेव जोडप्याकडून मिळाला तोच त्यांच्या पुनर्वसनाचा खंबीर पाया ठरला. दुसऱ्या एका प्रसंगात, जेव्हा एका मित्राची आई अचानक गंभीर आजारी पडली आणि त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले, तेव्हा जगदीशजी आणि मोनाताई लगेचच तेथे आले. मित्र कामानिमित्त परदेशी होता, आणि त्याच्या पत्नीस अशा कठीण वेळी मदतीची, मार्गदर्शनाची आणि आधाराची गरज होती. यातच जेव्हा त्या आईचे दुःखद निधन झाले तेव्हा मित्राच्या कुटुंबातील सदस्य असल्याप्रमाणे जगदीशजींनी आणि मोनाताईंनी सर्वपारे मदत केली. अशी कित्येक उदाहरणे देता येतील.

परिस्थिती कशीही असो, त्यांच्या कृतींमधून त्यांची तीव्र सहानुभूती, करूणा आणि इतरांना मदत करण्याची तयारी नेहमीच दिसून यायची. जगदीशजींची बँक ऑफ अमेरिका आणि द न्यू अमेरिकन्स युनायटेड वे मधील उत्कृष्ट कारकीर्द, व्यावसायिक यश व कामगिरी, आणि त्यांची समाजाचे ऋण फेडण्याची वृत्ती, या दोन्ही गोष्टी एकदम तोडीस तोड होत्या. जगदीशजींचा अतूट दयाळूपणा, नेतृत्व आणि औदार्य यांनी त्यांना ओळखणाऱ्या सर्वांवर एक जादुई छाप सोडली आहे. ते केवळ एक विश्वासू नेतेच नव्हते तर अनेकांचे प्रिय मित्रही होते. मोनाताई व त्यांचे इतर कुटुंबीय आणि न्यू जर्सीतील संपूर्ण मराठी विश्व समुदाय, जगदीशजींनी त्यांच्या जीवनातील कार्याने असंख्य जीवनात जो काही सकारात्मक बदल घडवून आणला ह्या बद्दल नक्कीच खूप समाधानी आहेत. आपणही त्यांच्या स्मृतीला मूर्त रूप देऊन त्यांच्या स्मृतींचा आदर करूया. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, आणि त्यांचा वारसा आपली पुढील वाटचाल अजूनच उजळवत राहो!

- **निरंजन देव - प्रकाश धारगळकर - संध्या देशपांडे**



**राशिभविष्य : जानेवारी २०२५**

**वक्री गुरु ग्रहाचा जानेवारीत महिनाभर उच्छाद**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## वृत्ताबद्दल - वृत्त

कळविण्यास आनंद होत आहे की - बृहन्महाराष्ट्र मंडळ वृत्ताच्या दिवाळी अंकाबद्दल काही सकारात्मक अभिप्राय आम्हाला मिळाले. त्यातील काही नमुने -

आपले ‘बृहन्महाराष्ट्र वृत्त’ मराठी मासिक बघून सुखद धक्का बसला. त्यातील लेख, कविता आणि बालकुमारांची चित्रे बघून खरोखरच खूप आनंद झाला.महाराष्ट्राबाहेर राहून मराठी भाषा जपणे हे किती अवघड कार्य आहे हे मी समजू शकते. त्यात ही आपण सर्व तर भारताबाहेर, मुलांची भाषा, संस्कृती वेगळी असून ही मराठी जोपासण्यासाठी घेत असलेले कष्ट बघून ऊर अभिमानाने भरून येतो. नक्कीच आपले कार्य स्तुत्य व कौतुकास्पद आहे .

दिवाळी अंकाचे  मुखपृष्ठ बघून मन प्रसन्न झाले. सर्वच लेख व कविता शब्दांत गुंफणे कठीण पण हा धावता आढावा हेच सांगतो की ......

एकूणच हा ‘दिवाळी अंक’ खूप सजला आहे. त्यात दिवाळीचा गोडवा, खुसखुशीतपणा, लज्जत, स्नेहाचा प्रकाश पसरल्याने अधिकच तजेलदार झाला आहे.

अभिनंदन - संपादक मंडळ तसेच पडद्यामागील अदृश्य सर्व हात ..सहकारी

**सौ. स्वाती वर्तक**

---

बृहन महाराष्ट्र मंडळाचा २०२४ चा दिवाळी अंक उत्तम झाला आहे.

विविध विषयांवरचे लेख, कथा, कविता उत्तम दर्जाच्या आणि खूप इंटरेस्टिंग आहेत. बरेच माहिती पूर्ण लेख तर काही हलके फुलके असा सुंदर समन्वय या अंकात दिसतो.

संपूर्ण कार्यकारी मंडळाचे हार्दिक अभिनंदन!

**अर्चना जोगळेकर**

---

उत्तर अमेरिकेतील मराठी अंकातला मजकूर जगभर जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावा म्हणून, हा अंक BookGanga च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच दिवाळी अंकाच्या छापील प्रति खालील ग्रंथालयात उपलब्ध आहेत -

- श्रीधर वासुदेव फाटक ग्रंथालय - राम मंदिर मार्ग, विले पार्ले (पूर्व) - मुंबई
- अमृता ग्रंथालय - सकाळ नगर, बाणेर रोड - पुणे
- मराठी ग्रंथ संग्रहालय -  स्टेशन रोड - ठाणे
- मराठी ग्रंथ संग्रहालय - गोखले पथ , नौपाडा - ठाणे
- विक्रम वाचनालय - दांडिया बझार - वडोदरा
- ब्राह्मण सभा ग्रंथालय - प्रताप रोड - वडोदरा
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय - नायगाव क्रॉस रोड, दादर पूर्व - मुंबई
- ग्रंथमित्र इंदौर (मध्य प्रदेश)
- गव्हर्नमेंट ग्रंथालय - राजिवडा - रत्नागिरी
- मोफत वाचनालय हरिपूर - देवल रोड - सांगली
- सांगली जिल्हा नगर वाचनालय - राजवाडा चौक - सांगली

---


नमस्कार,

इन्दोरच्या डॉ.सुनिता गुप्ते ह्याच्याकडून वृत्त दिवाळी अंकाची प्रत मिळाली. त्यांना हा अंक अनिता कांत ह्यांनी पाठवला आहे.

हा अंक मुक्त संवाद संचालित ग्रंथमित्र घरपोच वाचनालयात ठेवण्यात आला आहे.

अमेरिकेत मराठी दिवाळी अंक प्रकाशित करणे व तो बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना नि:शुल्क पाठवणे हे स्तुत्य कार्य आहे. मनःपूर्वक आभार!

**मोहन रेडगांवकर, अध्यक्ष**
**मुक्त संवाद साहित्यिक समिती, इंदौर**




दिवाळी अंकाचे बऱ्याच लोकांकडून कौतुक होत असल्याने आमचा अंक, दिवाळी अंकांच्या चार स्पर्धांमध्ये भाग घेत आहे. अंक त्या दर्जाचा आहे, ह्यातच आम्हाला समाधान आहे!

**विशेष सूचना - जानेवारी २०२५ अंकापासून, वृत्त पूर्णपणे ऑनलाईन झाले असल्यामुळे आम्ही त्यात अधिक प्रगतीशील बदल आणला आहे - जानेवारीच्या अंकात निवडक लेख व कविता ऑडिओ फॉरमॅट मध्ये आहेत. हेडफोनचे चिन्ह (🎧) क्लिक केल्यास तुम्हाला ते लगेच (हातातले काम न थांबवता) ऐकायला मिळेल. ज्या ‘वृत्त’ चाहकांना  श्रवणशक्तीचा वापर सोयीस्कर वाटतो, त्यांनी ह्या वैशिष्ट्याचा जरूर लाभ घ्यावा! ह्या महिन्याचा प्रयत्न यशस्वी झाल्यास, ऑडिओ फाईल  फॉरमॅट मधले लेख व कविता आणखी जास्ती प्रचलित होतील. 'पायलट रन' म्हणून काही लेख/कविता श्रवणीय स्वरूपात रूपांतरित करण्याचा आमचा हा आरंभिक प्रयत्न आहे. तर ह्याबद्दलचे तुमचे मनोगत आम्हाला जरूर कळवा!**

**जाता जाता ..... तुमचे प्रेम कायम, लिखाण प्रकाशित आणि वाचन चिरंतीत राहू द्या!!**

- **संकलन - नीता धोपेश्वरकर**, पार्सीपनी, न्यू जर्सी

## ‘द ग्रेट’ भेट

या ख्रिसमस ब्रेकमध्ये आम्ही ‘winter getaway’च्या निमित्ताने Grand Canyon, Las Vegas, San Diego आणि Los Angeles असा सहलीचा टप्पा पूर्ण केला. परतीच्या मार्गावर जाता जाता इस्कॉन (ISKCON) मंदिराला जाऊन, दर्शन घेऊ असा बेत ठरला. दर्शन घेऊन पोटपूजेसाठी शेजारीच ‘गोविंदा’ मध्ये गेलो. प्रसादाचे जेवण छान होते असे म्हणत बाहेर पडताच समोर एक अनपेक्षित आश्चर्याचा धक्काच बसला. २०२२ ते २०२४ पर्यंत ‘युनायटेड किंगडम’चे पंतप्रधान म्हणून काम केलेले रिशी सुनक हे इस्कॉन मंदिराच्या आवारात उभे दिसले... अगदी आमच्या समोर... डोळ्यांवर विश्वास बसेना... अगदी भारावून गेलो... काय योगायोग म्हणावा.



बहुदा ते आधीच मंदिरात जाऊन आले असावेत आणि निघण्यापूर्वी मंदिराच्या स्वयंसेवकांशी बोलत उभे असावेत. बाकीचे कुटुंबिय आधीच गाडीकडे गेले असावेत कारण आम्हाला फक्त त्यांच्या बरोबर उभी असलेली त्यांची मुलगी दिसली. त्यांचे दोन सहाय्यक त्यांच्या गाडीपाशी उभे असावेत पण रिशी सुनक मात्र तिथून थोडे दूर स्वतंत्रपणे बोलत उभे होते.

आम्ही त्यांच्याशी बोलायला जवळ गेलो. त्यांनी आनंदाने हस्तांदोलन केले, आमची विचारपूस केली आणि आमच्या सुट्टीबद्दलही विचारले. त्यांच्याकडून असे कळले की तेही त्यांच्या कुटुंबियांसह वैयक्तिक/खासगी सुट्टीवर आले होते. त्याच्या एका मुलीचे नाव ‘क्रीष्णा’ आहे हे लक्षात घेता, भगवान कृष्णावर मोठी श्रद्धा असावी, असा अंदाज.

कोणतीही सुरक्षा नसताना ‘फोर्ड एक्सप्लोर’ मधुन येऊन, एका सर्व साधारण तुम्हांआम्हांसारख्या भक्तांसारखीच देऊळाला भेट दिली आणि अचानक समोर आलेल्या आमच्यासारख्या सामान्य माणसांशी काही सेकंदांसाठी का होईना इतके नीट बोलून विचारपूस केली, वर फोटोही काढू दिला. केवळ आश्चर्यजनक. खरोखरच एका विनम्र व्यक्तिमत्वाचा प्रत्यय आला.

या अशा संस्मरणीय नोटवर Los Angeles ला निरोप देत Toronto ला रवाना झालो. जरी, या सुट्टीत काही कुटुंबिय आणि काही मित्र परिवाराला भेटण्याचा योग आल्याच्या आनंदाबरोबरच हा सुखद अनुभव म्हणजे अगदी ‘न भूतो न भविष्यती’ च.

अशी ही अनपेक्षित अविस्मरणीय स्मृती आम्ही आयुष्यभर आमच्या उराशी जपणार.

**- अपर्णा कोळेकर**

## समाजरंग : बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवा उपक्रम

बृहन्महाराष्ट्र मंडळ ही आता केवळ उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळांची छत्रीधारी संस्था राहिली नाही. अमेरिकेतील मराठी समाजाच्या विविध अंगांचे प्रतिनिधित्व करणारे आणि समाजाला सामावून घेणारे एक आधार छत्र म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळाकडे पाहिले जाते. विविध मराठी मंडळांच्या आवडीचे आणि निवडीचे उपक्रम या मंचावर केले जातात. ‘आहे तितुके जतन करावे । पुढे आणखी मेळवावे ।।’ अशी भूमिका आणि मांडणी असलेल्या मंडळाच्या उपक्रमात दर वर्षी नवी भर पडत आहे. समाजरंग हा उपक्रम आता सुरु झाला आहे.

समाजरंगाबद्दल अगदी थोडक्यात सांगायचे तर

“हात देऊ मदतीचे | सेतू बांधू अंतरीचे ||
जुळवू नाते मनांचे | स्वप्न पाहू सुपंथाचे||”

आपण उत्तर अमेरिकेतील मराठी लोक आपले यश एकमेकाना सांगण्यासाठी, मराठी कार्यक्रमांचा आस्वाद घेण्यासाठी एकत्र जमतो. ( मराठी मंडळात किंवा आणखी काही निमित्ताने..) मराठी म्हणून एकत्र येणे ही जशी आपली गरज आहे, तशी एकमेकांना कठीण प्रसंगात आधार देणे, मदतीचे हात देऊन पुढे जाण्यास मदत करणे ही मराठी समाज म्हणून आणि व्यक्ती म्हणूनही आपली गरज आहे. कारण आयुष्य एकट्याचे नसते, ते एकमेकांचे आणि एकमेकांसाठी असते. मदतीचे हात देणारा कोण आणि घेणारा कोण अशा भेदाच्या पलीकडला आनंद आणि फायदा दोघांनाही मिळतो.

‘देणाऱ्याने देत जावे |घेणाऱ्याने घेत जावे||
घेता घेता एक दिवस| देणाऱ्याचे हात घ्यावे.||’

असे विंदा करंदीकर म्हणून गेले.

‘मेंदूची क्षमता वाढवण्यासाठी आणि मनाचे आरोग्य टिकवण्यासाठी स्वतःपलीकडे जाऊन सेवा कार्य करावे’ असे आता संशोधन सुद्धा सांगते आहे. एकमेकांना साहाय्य करत समाजाची धारणा करून, सर्वांना सुपंथाला नेणारा तो धर्म. मग तो जगातला कोणताही धर्म असो. तो मानव धर्म! तो जीवनधर्म! समाजरंग म्हणजे नेमकी हीच संकल्पना आहे. एकमेकांना साहाय्य करण्यासाठी आपण चार पातळ्यांवर काम करू शकतो.

१. अमेरिकेतून महाराष्ट्रासाठी मदत
२. अमेरिकेतील भारतीय समाजासाठी काम
३. अमेरिकन समाजासाठी काही योगदान
४. जगातल्या जनताजनार्दनाची सेवा

या  सर्व पातळ्यांवर नि:स्वार्थीपणे काम करणारे मराठी लोक अमेरिकेत आहेत. काही स्वतंत्रपणे काम करतात. काही लोक संस्थाबरोबर काम करतात तर काहींनी स्वत:च्या संस्था निर्माण करून काम सुरु केले आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या व्यासपीठावर या सर्वांना एकत्र आणावे, जमेल तेवढे मार्गदर्शन करावे (आणि मार्गदर्शन घ्यावेसुद्धा) त्यातून मराठी समाजाला प्रेरणा मिळावी यासाठी आहे हा ‘समाजरंग’ उपक्रम ! याचे इंग्रजीत रूपांतर करायचे तर आपल्याला ‘social initiative’ असा शब्द वापरता येईल.

Meeting of the minds |
Dream one of a kind |
Helping hands of all kinds |
Bridging miles and minds ||

एकत्र काम केले तर आपली ताकद, प्रेरणा दशगुणित होते आणि आनंद शतगुणित !

हे काम बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मंचावरून करायचे आहे, तसे स्थानिक मराठी मंडळाच्या मंचावरून सुद्धा करायचे आहे. अमेरिकेतल्या मराठी आणि भारतीय समाजासाठी काम मुख्यतः स्थानिक मराठी मंडळाचेच  असावे लागेल.

बृहन्महाराष्ट्र मंडळाने महाराष्ट्रातले काही प्रकल्प करायचे ठरवावे आणि प्रत्येक मराठी मंडळाने त्यातला किमान  एक प्रकल्प हाती घ्यावा. असे केले तर महाराष्ट्रात किमान पन्नास प्रकल्प उभे करता येतील.

यासाठी आहे हा समाजरंग! याबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर (वेब साईट) माहिती दिली आहे. लवकरच प्रकल्पांबद्दल माहिती दिली जाईल.

यासाठी काही स्वयंसेवकांची समाजरंग समिती आहे. वृत्ताच्या प्रत्येक अंकात कामाच्या प्रगतीबद्दल चार ओळीत माहिती दिली जाईल.  तुम्हाला काही प्रश्न असतील किंवा काही सुचवायचे असेल तर माझ्या ई-मेल वर संपर्क करू शकता. (vidya.sapre@bmmonline.org)

तेव्हा आपले मदतीचे हात देऊन, अंतरे दूर करणारे सेतू बांधू. मनाची कवाडे उघडू आणि स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवू...

- **विद्या हर्डीकर-सप्रे**

## BMM Initiative Highlights

**Community Outreach:** We successfully conducted our first informative session on Astrology. It was a great success! Thanks to the overwhelming response, we have received enough registrations to kick off our first batch starting in January 2025.

In our **Photography initiative**, we hosted an interactive Zoom session on the ‘Basics of Photography,’ bringing together enthusiasts to learn and share their passion.




**(पॉडकास्ट) मुक्त-प्रसारण :** परदेशस्थ धकाधकीच्या जीवनात भाषेची आवड असणाऱ्या व ती जपणाऱ्या, साहित्यप्रेमी लोकांसाठी, बृहन्महाराष्ट्र मंडळ घेऊन येतंय साहित्यवाचन-पॉडकास्ट.

२०२४मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळानं ‘एकता-संवेदिनी’ ह्या गत-त्रैमासिकातील निवडक कथा संकलित करून, ध्वनीमुद्रित माध्यमातून, तुमच्यापर्यंत प्रसारित केल्या, ज्यात परदेशस्थ मराठी लोकांचे जीवन, त्यांचे अनुभव, त्यांच्या कथा, व्यथा व त्यानुसार त्यांचे प्रेरणादायी संदेश ह्यांचा समावेश केलेला होता आणि आता लवकरच आपल्याला बरीच वर्ष परदेशात स्थायिक असलेल्या व अमेरिकेतील ग्रामीण जीवन जवळून अनुभवायला मिळालेल्या, डॉ. संजीव चौबळ यांचे ‘गावाकडची अमेरीका!’ हे पुस्तकही ऐकायला मिळणार आहे. ज्यात अमेरिका ही फक्त सिलिकॉन व्हॅली, कॉफीशॉप, मॉलमधली झगमगाटी दुकानं इथपर्यंतच मर्यादित न राहता, तिथल्या खऱ्या ग्रामीण मातीत ती कसा श्वास घेते?, ह्यावरच जास्तीत जास्त भर टाकलेला आहे.

तर अशा आणि बऱ्याच ओघवत्या साहित्य-ध्वनीमुद्रित प्रकल्पामधे, अजून एक, शोभा चित्रे ह्यांच्या लिखाणाचाही परिचय तुमच्यापर्यंत घेऊन येणार आहे आपले लाडके बृहन्महाराष्ट्र मंडळ.

अशा मराठी भाषा आणि संस्कृती संवर्धनाच्या मोहीमेत प्रत्येक मराठी माणूस नक्कीच सहभागी होऊ शकतो. त्यासाठी इच्छुक सभासदांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाला एक अर्जरूपी तयार-पत्रक पाठवावे, आणि आपल्या अमूल्य योगदानाचा लाभ प्रत्येक मराठी माणसाला द्यावा.

याचबरोबर लहान मुलांसाठीही त्यांची मराठी भाषेची आवड, आत्मीयता व त्यांचे भारतातले वैयक्तिक लागेबांधे जपण्यासाठी,

मंडळाने सध्या बालभारती व किशोर मासिकाच्या ध्वनीमुद्रित पॉडकास्टचा प्रकल्प हाती घेतला आहे.
श्रवणामुळे कोणतीही भाषा व तिच्यात दडलेली संस्कृती, तिचे अस्तित्व टिकवण्यासाठी व आणखी समृद्ध करण्यासाठी मदत होते. म्हणूनच, बृहन्महाराष्ट्र मंडळाने सुरू केलेल्या 'पॉडकास्टिंग' ह्या खास कार्यक्रमाला व प्रकल्पाला प्रत्येक मराठी माणसाने उदंड प्रतिसाद द्यावा हीच सदिच्छा.

## Yuwa 2024-26 Team Introduction



BMM President
Prasad Panwalkar



BMM E. C.
Rahul Deshmukh



### BMM Yuwa Lead : Pravin Pingle

नमस्कार, मी प्रवीण पिंगळे , महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट मंडळाचा सदस्य आहे. मी महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट मंडळाचा लॉजिस्टिक ग्रुपचा लीड म्हणून काम करत आहे, गेली २ वर्षं मी BMM पॉडकास्टचे काम केले आहे. मला आपल्या BMM युवा टीम सोबत काम करायला मिळणार आहे, युवा मंडळींसोबत काम करायला मला खूप आवडेल. आपण खूप धमाल कार्यक्रमाचे आयोजन करतो आहोत. चला, आपण सर्व मिळून नवीन मित्रमंडळी एकत्र काम करू. युवा संदर्भात आपणास कुठलीही नवीन योजना उपक्रम सुचवायचे असेल तर कृपया युवा टीम सोबत संपर्क करा.

I would like to invite all BMM mandals youth teams to engage with us for fun filled activities planned for our BMM youth community.
Following Activities are planned

- Cultural tour of Maharashtra
- Youth Get Together
- BMM Youth Internship

### BMM Yuwa Lead : Arti Karkar



नमस्कार, माझं नाव आरती कारकर, मी महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क ची सदस्य आहे. मराठी भाषेत संवाद साधणाऱ्या युवा गटामध्ये वाढ व्हावी आणि आपल्या संस्कृतीशी युवा गटाची ओळख व्हावी असे मला मनापासून वाटते आणि त्यासाठी मी बी.एम.एम युवा कार्यकारणीमध्ये कार्यरत आहे. मराठी भाषेला इंटरनॅशनल पातळीवर इतर भाषांबरोबर महत्वाचा दर्जा मिळावा ही माझी इच्छा आहे. उत्तर अमेरिकेत माझं खूप मोठं मराठमोळं मित्रमंडळ आणि कुटुंब असावे असे मला वाटते.
Let's be Friends, and plan engaging and interesting Yuwa events together in 2025! मी २०२३ मध्ये Yuwa President म्हणून काम सांभाळले.
I am confident that Yuwa will be even more actively involved in the upcoming year.

### Yuwa : Aarya Bhoite



Aarya Bhoite is a freshman at the University of Washington where she is majoring in data science. She was the 2023-2024 BMM Yuwa Secretary and managed the 2024 youth summer internship program. She was also the Seattle Maharashtra Mandal Yuwa President and has volunteered at BMM for the past 7 years. She looks forward to fostering meaningful connections among Marathi youth and creating opportunities for them to pursue their passions!



### Yuwa: Ketaki Naik

Hi! My name is Ketki Naik and I'm from St. Louis, Missouri. I am currently a freshman and I go to Saint Louis University. I'm involved in Yuwa because I enjoy meeting other people and it's a great way to connect with everyone!

# BMM मराठी शाळा किल्ला स्पर्धा

BMM मराठी शाळेतर्फे दरवर्षी प्रमाणेच मोठ्या उत्साहात 'किल्ला स्पर्धा' आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे हे पाचवे वर्ष असून, ती परदेशात राहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या कौशल्यांना वाव देण्यासाठी आयोजित केली जाते. श्री. प्रसाद पानवळकर, BMM अध्यक्ष आणि श्री. राहुल देशमुख BMM - शाळा प्रमुख यांचे त्याबद्दल विशेष कौतुक.

या वर्षी ७० हून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यातून ५ विजेते आणि ३ उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून या क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. पांडुरंग शिरवळकर आणि सौ. सुमन शिरवळकर उपस्थित होते.

अल्बनी महाराष्ट्र मंडळ (AMM) यांच्या 'रायगडा'ने पहिला तर पिट्सबर्ग मराठी शाळेच्या 'सिंधुदुर्ग' आणि शिकागो मराठी शाळेच्या 'शिवनेरी' किल्ल्याने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा नंबर पटकावला. बाकी विजेत्यांची नावे आणि छायाचित्रे सोबत जोडत आहोत.























**BRUHAN MAHARASHTRA MANDAL, NORTH AMERICA**

**BMM Initiatives**

- ज्योतिषशास्त्र (Astrology Course)
- पौरोहित्य (Hindu Priest Course)
- शास्त्रीयसंगीत (Classical) by Mahesh Kale School of Music
- सुगमसंगीत (Light Vocal Music) by Aniruddha Joshi
- मराठीबोलीभाषा वर्ग (Conversational Marathi Class)
- संस्कृत वर्ग (Sanskrit Class)
- महाराष्ट्रसांस्कृतिक सहल (Cultural Tour of Maharashtra)
- आपलीसांस्कृतिक ओळख (Optional Shala Cultural Program)
- समाजरंग (Social Cause)

For more details visit: https://bmmonline.org

## बृ. म. मंडळाचा मराठी शाळा उपक्रम

जाणतो मराठी..
आम्ही मराठी
प्राण आमुचा मराठी
चला शिकवूया मराठी...

मराठीविषयी प्रेम बाळगणाऱ्या प्रत्येकासाठी परदेशामध्ये मराठी शाळेच्या एका छोट्याशा रोपट्याचा वटवृक्ष होताना पाहणे खरंच अभिमानाची गोष्ट आहे.

**अमेरिकेत मराठी शाळेची मुहूर्तमेढ :** मराठी शाळांची सुरवात खरं म्हणजे महाराष्ट्रातून अमेरिकेत वेगवेगळया ठिकाणी स्थायिक झालेल्या अनेकांच्या घरांमध्ये झाली. आपल्या मुलांना आपल्या संस्कृतीची आणि भाषेची ओळख व्हावी, ही त्यामागची भावना होती. ह्या घरगुती शाळांना औपचारिक स्वरूप देण्याचे मोठे काम ऐंशी तसेच नव्वदच्या दशकांत झाले. यात कॅनडा-निवासी सुनंदाताई टुमणे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनीही घरीच शाळेचा वर्ग सुरू केला होता. पण जशी जशी मुलांची संख्या वाढू लागली, त्यांना मोठ्या जागेची गरज भासू लागली. त्यांनी Heritage Language या उपक्रमांतर्गत एका शाळेत वर्गासाठी जागा मिळवली. मग तिथून सुरू झालेला प्रवास थांबलाच नाही. पुढे जाऊन, सुनंदाताईंनी अथक परिश्रम करून मराठी भाषेला कॅनडाच्या शिक्षण प्रणालीमध्ये परदेशी भाषेचे स्थान मिळवून दिले.

**मराठी शाळेला छत्र लाभले :** नॉर्थ कॅरोलायना इथे मराठी शाळा चालवणाऱ्या डॉ. विजया बापट आणि सुनंदाताई यांनी २००७ साली फिलाडेल्फिया येथे उत्तर अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळांच्या शिखर परिषदेत शाळेच्या प्रकल्पाची कल्पना सगळ्यांसमोर मांडली. "महाराष्ट्र मंडळांच्या उपक्रमांशी पुढील पिढीला जोडून घ्यायचे असेल तर त्यांना मराठी शिकवायला हवे नाहीतर ती मंडळांपासूनच नव्हे तर परिवारापासूनही दूर जाईल" असा इशारा सुनंदाताईंनी दिला. यामुळे बृ. म. मंडळाने मराठी शाळेचा उपक्रम हाती घ्यायचे ठरवले. लीनाताई देवधरे आणि सुनंदाताईंनी महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. उत्तर अमेरिकेतील मुलांसाठी कुठल्या प्रकारचा अभ्यासक्रम योग्य ठरेल, याचा अभ्यास करून त्यांनी भारती विद्यापीठाची निवड केली. त्यानंतर बृ. म. मंडळ आणि भारती विद्यापीठाने मिळून मराठी शाळेला विस्तारित स्वरूप दिले.

**साजेसा अभ्यासक्रम आणि मूल्यमापन:** अमेरिकेतील मुलांचा विचार करून बृ. म. मंडळाच्या शाळा समितीने पहिली ते पाचवीपर्यंतचा अभ्यासक्रम तयार केला तसेच त्या अनुरूप पाठयपुस्तकेही तयार केली. उत्तर अमेरिकेतील मुले ज्या वातावरणात वाढतात त्या वातावरणाशी संबंधित धडे या पाठयपुस्तकांत आहेत. हळूहळू बृ. म. मंडळाच्या शाळांचा विस्तार उत्तर अमेरिकेतील अनेक राज्यांत झाला. बृ. म. मंडळाशी संलग्न असणाऱ्या अनेक महाराष्ट्र मंडळांनी बृ. म. मंडळाच्या शाळा प्रणालीच्या अंतर्गत स्थानिक मराठी शाळा सुरु केल्या. या सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी वार्षिक परीक्षांचे आयोजन सुरु झाले. त्याचबरोबरीने विद्यार्थ्यांना बृ. म. मंडळ आणि भारती विद्यापीठाचे संयुक्त प्रमाणपत्र देण्यास सुरवात झाली. यामध्ये सुनंदाताई, कोमल चौककर आणि सोना भिडे यांच्याबरोबरच अनेकांचा मोलाचा सहभाग होता. मुलांसाठी दिवाळी अंक, समूह गीत स्पर्धा, शुद्धलेखन आणि हस्ताक्षर स्पर्धा असे विविध उपक्रम वृद्धिंगत करण्यात आले.

**बालभारती अभ्यासक्रम आणि महाराष्ट्र शासनाबरोबर करार:** यानंतर बृ. म. मंडळाच्या मराठी शाळेची धुरा सविता मोरे यांनी २०२२ साली आपल्या खांद्यावर घेतली. त्यांनी महाराष्ट्र सरकारबरोबर बालभारती अभ्यासक्रम आणि परीक्षांबाबत बोलणी चालू केली. २०२४ साली बृ. म. मंडळाचे अध्यक्ष प्रसाद पानवळकर, शाळा विभागाचे प्रमुख राहुल देशमुख आणि इतर समिती- सदस्य यांच्या उपस्थितीत बृ. म. मंडळ आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात एक ऐतिहासिक करार झाला. या करारानुसार बृ. म. मंडळाच्या शाळांतील विद्यार्थी बालभारतीचा अभ्यासक्रम शिकू शकतील तसेच महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या मराठीच्या परीक्षांनाही बसू शकतील. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळेल.

**शाळांचा विस्तार आणि वटवृक्षात रुपांतर:** "अमेरिकेतील मुलांना मराठी संस्कृती लक्षात यावी, त्यांना मराठी समजावे, खास करुन मुलांना भारतात रहाणाऱ्या आपल्या लाडक्या आजी-आजोबांशी बोलता यावे, अशी मनोमन इच्छा होती", असे शाळा विभागाचे प्रमुख राहुल देशमुख यांनी वृत्ताच्या चमूला सांगितले. यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांतून आज साठ मंडळांच्या शंभर मराठी शाळा यशस्वीपणे चालू आहेत. या सर्व शाळांमधून सुमारे ४५००-५००० मुले शिकत आहेत.

कॅनडा आणि अमेरिकेनंतर आता या शाळांचा विस्तार यु.के., डेन्मार्क, कोपनहेगन आणि ऑस्ट्रेलियातही झाला आहे. यासाठी

साधारण ४०० स्वयंसेवक झटत आहेत. याबरोबरच शाळेचा अभ्यासक्रम, परीक्षा, शिक्षकांचे प्रशिक्षण, सांस्कृतिक पुस्तके, प्रशस्तिपत्रके इत्यादी विषयांवर एकूण नऊ जण कार्यरत आहेत. त्यांना मदत करणाऱ्या स्वयंसेवकांसह एकूण ३८ जण कार्यरत आहेत.

**मराठीचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन हेच ध्येय:** सध्या 'मराठी शाळा' या उपक्रमाचे काम श्री. राहुल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उत्साहाने सुरु आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये शाळा समिती, शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्या बैठकीने २०२४-२६ च्या बृ. म. मंडळाच्या मराठी शाळेच्या सत्राचा शुभारंभ झाला. शाळा समितीतर्फे मराठीच्या संवर्धनासाठी वैविध्यपूर्ण आणि उपयुक्त असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यावर्षी प्रथमच अथर्वशीर्ष पठणाचे अभ्यासवर्ग आयोजित करण्यात आले. मराठी पॉडकास्ट या उपक्रमाद्वारे गेल्या दीड वर्षात २०० हुन अधिक गोष्टी कथन करण्यात आल्या. आत्तापर्यंत चाळीस देशांतील १५००० मुलांनी या कथांचा आस्वाद घेतला आहे. सध्या किशोर मासिकात प्रसिद्ध झालेल्या कथांवर आधारित एक मालिका सुरु आहे. दरवर्षीप्रमाणेच २०२४ मध्ये म्हणजे सलग ५ वर्षे उत्तर अमेरिकेतील रहिवाशांसाठी रहिवाश्यांसाठी किल्ला स्पर्धा घेण्यात आली. ७० हून अधिक शाळांनी या स्पर्धेत भाग घेतला. केवळ मुलांसाठीच नाही तर शिक्षकवर्गासाठीही निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली गेली. १० जानेवारी २०२५ रोजी आंतरशालेय समूहगान स्पर्धा आयोजित केली आहे. आजी-आजोबांना पत्र लेखन, बालक-पालक इत्यादी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये, हायस्कूल क्रेडिटसाठी इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांत द्विभाषिकतेचे प्रमाणपत्र (Seal of Bilibuality) कसे मिळवावे या विषयावर एक परिसंवाद घेण्यात आला .

**शिक्षकांना प्रशिक्षण :** बाहेरदेशी शाळा सुरू करताना कोणी तज्ञ नसून यामध्ये हौशी लोकांचा आणि शाळेतील पालकांचा समावेश असतो. त्यामुळे नवीन शिक्षकांना बृ. म. मंडळातर्फे प्रशिक्षण दिले जाते. नवीन शाळा कशी उभी करायची याचेही रीतसर मार्गदर्शन दिले जाते. अमेरिकेतील मुलांच्या कानावर मराठी भाषा पडत नाही. त्यांना मराठीची गोडी कशी लावायची, त्यांच्याकडून भाषेचा सराव कसा करून घ्यायचा, मुलांच्या कलाने कसे घ्यायचे त्याची तयारी करून घेतली जाते. पुढील वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या बालभारती पाठ्यक्रमाविषयीचे प्रशिक्षण ११-१२ डिसेम्बर, २०२४ रोजी आयोजित केलेल्या एका शिबिराद्वारे यशस्वीरीत्या देण्यात आले. मुलांनी दररोज १५ मिनिटे एकत्र सराव केला तर त्यांच्या भाषेत खूप मोठा बदल घडून येऊ शकतो, हे जाणवल्याने राहुल देशमुख यांनी Zoom Platform वर स्थानिक शाळांनी दैनिक वर्ग चालवण्याची योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेतील मराठी शाळांच्या विकासासाठी सध्या राहुलजी वेगवेगळ्या शाळांना भेट देत आहेत; शिक्षकांशी चर्चा करत आहेत आणि स्थानिक अडचणी समजून घेत आहेत.

**एवढ्या जगात माय मानतो मराठी:** महाराष्ट्रापासून दूर अमेरिकेत स्थायिक झालेल्या आपल्या सगळ्यांसाठी मराठी शाळा हे आपल्या पुढच्या पिढीला आपल्या मातृभूमीशी आणि संस्कृतीशी जोडणारे महत्त्वाचे साधन आहे. ते असेच वृद्धिंगत व्हावे ही सदिच्छा!

**- अदिती खिस्ती- बेलसरे,** मॅन्टीका, कॅलिफोर्निया

## आरोग्यम् धनसंपदा

**वजन कमी करणारी, साखर विरहित Smoothie..**

**साहित्य:**

१ कप दुधी भोपळा (धुऊन, सोलून आणि चौकोनी तुकडे करून)

१ कप कोहळा (धुऊन, सोलून आणि चौकोनी तुकडे करून)

१ काकडी

१ टेबलस्पून लिंबाचा रस

१/२ इंच आले

१/४ इंच हळद (ताजे मूळ)

२-३ मिरीचे दाणे

चिमूटभर सैंधव मीठ


**कृती:** सर्व साहित्य स्मूदी-जारमध्ये घालून एकसंध करावे आणि आपल्या Smoothie चा आनंद घ्यावा.

- **सोनाली सुर्वे**



## वारसा

बृहन्महाराष्ट्र मंडळ सादर करीत आहे नवा प्रकल्प ‘वारसा’ Youtube मालिका. मराठी समाजाने उत्तर अमेरिकेत स्थलांतर करताना बरोबर आणला संस्कृतीचा, शिक्षणाचा, आठवणींचा, आशिर्वादांचा आणि मराठी मातीचा वारसा. आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो आणि इथल्या मातीत आपली मूळ रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अश्या गोष्टी एकत्रित केल्या की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे ‘वारसा’ हा प्रकल्प.



वारसा मालिका भाग १२ ‘योगायोगाच्या गोष्टी’ विराज सरदेसाई यांच्या बरोबर क्रांती गोडबोले गप्पांच्या ओघात जाणून घेणार आहेत डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या हेडस्टोनच्या शोधाबद्दल. साधारण १९६० च्या आसपास पेपरमध्ये एक जाहिरात यायची त्यामुळे आनंदी गोपाळ हे नाव घराघरात पसरलं होतं. लहानपणी सहज कानावर पडलेली, वाचलेली गोष्ट, लक्षवेधी नाव व त्याच नावाशी जोडला गेलेला, अगदी ध्यानीमनी नसताना आलेला त्यांचा अमेरिकेतला अनुभव. पाहुया विराज सरदेसाई यांची मुलाखत. जाणून घेऊ या कामात लागलेल्या त्यांच्या हातभाराविषयी.

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#१२) ‘योगायोगाच्या गोष्टी’
www.youtube.com/watch?v=wYDZ2h2ZIKc
किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

BMM-Varasa - YouTube हा प्रकल्प आवडला तर जरूर तुमच्या प्रतिक्रिया कळवा, तसेच या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी इथे register कराः
https://bmm2.page.link/varasa
तुमच्या मित्रमंडळी सोबत हा message share करा. पुढील भाग बघण्यासाठी वरील YouTube Channel subscribe करा.

- BMM Varasa Team

## नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

नवीन ऊर्जा, नवीन ध्येये, नवीन आकांक्षा
वर्ष नवे हे घेऊन आले हर्ष आणि आशा llधृll
जरा पाहूया मागे वळूनी
काय मिळवले, काय गमवूनी
काही जुळल्या, काही तुटल्या स्वप्नांच्या रेषा ll१ll
वर्ष नवे हे घेऊन आले हर्ष आणि आशा llधृll
जे अपुले ते हृदयी धरावे
चुकांस अपुल्या माफ करावे
पुसून टाकू दु:ख, तोडुनी अश्रूंच्या पाशा ll२ll
वर्ष नवे हे घेऊन आले हर्ष आणि आशा llधृll
उभे समोरी नवीन जीवन
स्वागत करूया त्याचे आपण
उरात भरुनी गाणे आणि मुखी गोड भाषा ll३ll
वर्ष नवे हे घेऊन आले हर्ष आणि आशा llधृll

- **अनिता म. कांत, सॅन रमोन, कॅलिफोर्निया**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## २०२४चा आढावा AIच्या दृष्टिकोनातून

२०२४ हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) आणि वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले. या वर्षीचे फिजिक्स आणि रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार ए.आय. प्रेरित संशोधनांना मान्यता देऊन हे दाखवतात की ए.आय. आता केवळ स्वयंचलनासाठी नसून वैज्ञानिक शोधांच्या केंद्रस्थानी आहे. ए.आय. जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि इतर वैज्ञानिक शास्त्रात घडवून आणत असलेल्या काही क्रांतिकारक बदलांचा थोडक्यात आढावा घेऊ या.

२०२४ मध्ये भौतिकशास्त्राचा नोबेल पुरस्कार ज्यॉफ्री हिंटन आणि जॉन होपफिल्ड यांना त्यांच्या कृत्रिम न्युरल नेटवर्क्सवरील क्रांतिकारक कामासाठी देण्यात आला. त्यांच्या संशोधनामुळे आधुनिक ए.आय. तंत्रज्ञानाला चालना मिळाली. या न्युरल नेटवर्क्सच्या तंत्रज्ञानाच्या सहाय्यानेच अल्फाफोल्ड सारख्या मॉडेल्सचा जन्म झाला, ज्यामुळे त्रिमीत प्रोटीन संरचना समजणे शक्य झाले.

२०२४ चा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार डेव्हिड बेकर, डेमिस हस्साबिस, आणि जॉन जंपर यांना मिळाला. प्रोटीन संरचना आणि प्रोटीन डिझाइनमध्ये ए.आय. वापरण्याबद्दलचे त्यांचे संशोधन आहे. नवीन औषधे, बायोटेक्नॉलॉजी आणि पर्यावरणशास्त्रात वापरले जाऊ शकतील असे संपुर्णतया नवीन प्रोटीन बनवणे सुद्धा आता शक्य आहे.

ए.आय.ने डिझाइन केलेले प्रोटीन वापरून, प्रदूषकांचा नाश करू शकणाऱ्या एंझाइम्सची निर्मिती आता शक्य आहे. तसेच असाध्य रोगांसाठी लसी बनवणे सुद्धा सोपे झाले आहे. ए.आय. नजीकच्या भविष्यात आरोग्य आणि औषधशास्त्रात क्रांती घडवून आणणार हे निर्विवाद.

याचे एक उदाहरण म्हणजे या वर्षी एनव्हायरॉन्मेंटल प्रोटेक्शन एजन्सीने मान्यता दिलेले एक RNAवर आधारीत किटकनाशक. अनेकदा एखाद्या पिकासाठी एखादी ठराविक किड विनाशकारी असते. नेहमीची किटकनाशके मात्र त्या किड्यांशिवाय इतरही किड्यांना - जे की पिकांसाठी चांगली असतात अशा किड्यांनाही - हानी पोचवतात. हे नव्या प्रकारचे किटकनाशक किडीमधील अशा एखाद्या जनुकाला (gene) टार्गेट बनवतात जे इतर किड्यांमध्ये आढळत नाही. कोलोरॅडो पोटॅटो बिटल उत्क्रांत होऊन नेहमीच्या रासायनिक किटकनाशकांना दाद देत नाही. हे नवे किटकनाशक झाडांवर फवारल्यास ती पाने त्या किड्यांनी खाल्ल्यावर हा RNA किड्यांमधील एक प्रोटीन बनू देण्यात बाधा आणतो आणि काही दिवसात ते किडे मरतात. इतर काही किडींसाठी अशीच प्रक्रिया वापरणे सुरू होत आहे. आणखीही किडी आहेत जिथे RNAवर एक कोटींग चढवून मग वापरावे लागेल जेणेकरून त्या किडींमधील संरक्षक एन्झाईम्सपासून RNA सुरक्षीत राहील. अर्थात ही बायो-चढाओढ सुरूच राहणार. हा जेनेटीक मॉडिफिकेशनचाच प्रकार आहे, आणि हे आपलं भवितव्य आहे - जेनेटीक बदल निसर्गात सततच होत असतात, आणि त्यामुळेच मानवजात अजून अस्तित्वात आहे.

खगोलशास्त्रीय शोधांमध्ये ग्यानीमिड या गुरूच्या चंद्रांवर पृथ्वीच्या सागरांपेक्षा जास्त पाणी असलेला पृष्ठभागाखालील सागराचा शोध महत्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे हबलपेक्षा मोठा परावर्तक असलेला जास्त संग्रहशाली जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप २०२२मध्ये कक्षेत स्थापन झाला. तेव्हापासून त्या दुर्बिणीने लावलेले अनेक शोध अभूतपूर्व आहेत. यात पृथ्वीच्या आकाराचे एक्सोप्लॅनेट्स आहेत, तसेच सर्वात दूरच्या (आणि विश्वाच्या सुरुवातीच्या) गॅलॅक्सीचा शोध आहे. अशा शोधांमुळे ब्रह्मांडाच्या आपल्या माहितीत, आमूलाग्र भर पडत आहे. २०२४मध्ये असे लक्षात आले की दूरवरच्या या दीर्घिका (गॅलॅक्सी) आधी वाटत होते त्यापेक्षा आकाराने छोट्या आहेत, म्हणजेच त्या जास्त तेजस्वी असणार, किंवा सुरूवातीला जास्त कृष्णविवरे असणार जे आजूबाजूच्या वस्तुमानाला भक्ष बनवून फस्त करत उर्जा उत्सर्जित करत असणार. त्या दीर्घिकांच्या आपल्यापर्यंत पोचणाऱ्या प्रकाशाचे स्पेक्ट्रोस्कोपीद्वारे विघटन करून हे दिसले आहे की त्यांच्यामध्ये प्रचंड प्रमाणात कर्ब आणि प्राणवायू असलेली धूळ होती. विश्व ९९% हायड्रोजन आणि हिलीयमचे बनले आहे. कर्ब आणि प्राणवायूसारखे घटक ताऱ्यांच्या गर्भातच बनतात. त्यांचा या धुलिकेतला अंतर्भाव हे दर्शवतो की विश्वाच्या सुरूवातीलाच महाकाय तारे बनले, झपाट्याने त्यांच्या जीवनचक्रातून जाऊन सुपरनोव्हा स्फोटात अंत पावले आणि आपले अंतरंग आसपास विखुरले. यामधूनच काही कृष्णविवरे बनली, पण काही इतरही प्रकारे बनली असणार.

पुन्हा पुन्हा वापरता येण्यासारख्या रॉकेट्सची निर्मिती सुरू झाल्यामुळे खगोलझेपा कमी खर्चिक ठरणार आहेत. १३ ऑक्टोबरला स्टारशिपच्या बूस्टर स्टेजने केलेले लँडिंग अभूतपूर्व होते. आवाजाच्या वेगापेक्षा जास्त वेगाने आकाशातून खाली येत असताना, बूस्टरने त्याच्या ३३ पैकी काही इंजिन पुन्हा सुरू केले, स्वत:ला थोड्या वेळासाठी चक्क हवेत थांबवले आणि काही मिनिटांपूर्वी जिथून उड्डाण केले होते त्या टॉवरकडे सरकले. बूस्टर जवळ येताच टॉवरच्या चिमटीसारख्या काट्यांनी त्याला मिठीत घेत मूळ जागेवर आणले. काही दिवसांनी सगळ्या टेस्ट्सनंतर बूस्टर नव्या चढाईसाठी सज्ज.

सुनीता विल्यम्स आणि विलमोर हे इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर अडकले आहेत असे जरी म्हणता येत नसले तरी त्यांना तडकाफडकी परत आणता न येणे हे मात्र अजून बरीच प्रगती व्हायची आहे याचेच लक्षण आहे.

पर्यावरणशास्त्रात, ए.आय. च्या मदतीने हवामान मॉडेलिंग जास्त प्रगल्भ होत आहे. केवळ संगणकीय मॉडेल्स वापरले तर त्यात चुका संभवतात. त्यामुळे भौतिकशास्त्रावर आधारित मॉडेल्स वापरणे जास्त संयुक्तिक आहे आणि तसे होण्याला आता गती मिळाली आहे. उदाहरणार्थ मातीतील आर्द्रतेचे अधिक अचूक भाकीत आता शक्य आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना जलस्रोतांचा अधिक प्रभावीपणे वापर करता येतो. एका नवीन पद्धतीमुळे चक्रीवादळांच्या तीव्रतेची जास्त अचूक पूर्वसूचना मिळवता येते, जेणेकरून अशा तीव्र हवामानाच्या घटनांसाठी लागणारी पूर्वतयारी करता येईल. अशा अनेक गोष्टींमुळे हवामानातील बदलांबद्दल आणि पर्यायाने जागतिक तापमान वाढ आणि पर्यावरणीय संकटांच्या बाबतीत जास्त प्रभावी निर्णय घेता येणे शक्य होत आहे.

चॅटजिपिटीसारख्या लार्ज लँग्वेज मॉडेल्सचा जन्म जरी २०२४ मधला नसला तरी याच वर्षी त्यांनी साधलेली प्रगती सर्वदूर पोहोचली आहे. आता अनेक लोक गुगल ऐवजी माहिती शोधण्यासाठी या प्रणालींचा उपयोग करतात. भाषेबरोबरच चित्र, चित्रफिती, तसेच अनेक प्रकारच्या आवाजी किमयाही लोकांना थक्क करत आहेत. निबंधांसारखे कॉलेज ऍडमिशनचे आधारस्तंभ डळमळून ते आवश्यक तरी आहेत का असे मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ या प्रारूपांच्या भाषाप्रभुत्वाने आणली आहे.

पण या झगमगाटाला एक भलीमोठी काळी झालर आहे. ए.आय.ची वाढती व्याप्ती पाहता त्यासंबंधीत नैतिक परिणामांबद्दल जागरूक राहणे गरजेचे आहे, AI चा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे. भाषा सर्वांना जवळची आणि रोजच्या व्यवहारातली असल्यामुळे लार्ज लँग्वेज मॉडेल्सचा उपयोग सर्वात जास्त पसरला आहे. अनेकांना हे माहीत नाही की प्राप्त माहितीवर आधारित त्यातील त्रुटी न समजल्यामुळे त्यातील परस्पर विरोधी माहिती नीट एकत्र न करता आल्यामुळे अनेकदा हे मॉडेल्स चुकीची माहिती पण अतिशय कॉन्फिडेंटली आणि चांगल्या भाषेत देऊ शकतात. ते कसे किंवा का होते हे सर्वांनी शिकून घेणे महत्त्वाचे आहे. या प्रारूपांप्रमाणेच मनुष्य देखील त्याच्या प्राप्त माहितीवर आधारित मानसिक पूर्वग्रहांनी प्रभावित होतो. डिजिटल मिडिया आणि माहितीच्या प्रमाणाच्या overload च्या युगात, चुकीची माहिती वेगाने पसरू शकते, ज्यामुळे सार्वजनिक समज विकृत होतो आणि वैज्ञानिक प्रगतीला अडथळा येतो. म्हणूनच, आपल्याला गंभीर विचारशक्ती आणि शास्त्रीय साक्षरतेला प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जेणेकरून सर्वसामान्य लोकही तथ्य आणि काल्पनिक गोष्टी यातला फरक ओळखू शकतील. ए.आय.च्या युगात सगळे सुरळीत ठेवण्याकरता स्ट्रॉंग पॉलिटिकल विलची गरज आहे. इतिहास मात्र दर्शवतो की राजकीय शासनसंस्था, विशेषत: एकाधिकारशाही, वैज्ञानिक प्रगतीत अडथळे आणू शकते, शैक्षणिक स्वातंत्र्य दडपून विज्ञानबाह्य कल्पनांना प्रोत्साहन देऊ शकते. यामुळे वैद्यकीय, तंत्रज्ञान आणि पर्यावरणशास्त्र यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांतील प्रगती मंदावू शकते. ते सर्व लक्षात घेऊन नीरक्षीरविवेक केवळ हंसावर न सोडता आपण सर्वांनी अंगीकारायची ही वेळ आहे.

२०२४ हे ए.आय. आणि विज्ञानासाठी एक महत्त्वपूर्ण वर्ष ठरले आहे. फिजिक्स आणि रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कारांनी जीवशास्त्र आणि रसायनशास्त्रासारख्या क्षेत्रांमध्ये ए.आय. च्या भूमिकेला कोंदण प्राप्त झाले, तसेच इतर वैज्ञानिक शास्त्रांवरील त्याच्या व्यापक प्रभावाचेही दर्शन झाले. अशीच प्रगती पुढेही होत राहणार. राजकीय हस्तक्षेप आणि चुकीच्या माहितीपासून ए.आय.ला मुक्त ठेवायची आपली जबाबदारी आहे.

- **आशिष महाबळ**, पॅसाडेना, कॅलिफोर्निया

## मकर-संक्रांत

तीळ-गुळ, हलव्यावर पाकाचा फुलवलेला काटा
घट्ट करी प्रेमाचे स्नेहबंधन, फुलवी जीवन वाटा
रंगीबेरंगी स्वप्नांचा पतंग, उंच उडे आसमानात
तीळ-गुळ द्या-घ्या, गोड बोला, राहुनी प्रेमात




सर्वांना मकरसंक्रांतीच्या सणाच्या हार्दिक शुभेच्छा!!! मकरसंक्रांत हा जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष या दहाव्या मराठी महिन्यात येणारा सण असून सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे. मकर संक्रांतीला महाराष्ट्रात नुसतेच 'संक्रांत' म्हणूनही संबोधले जाते. मकर

संक्रांती (उत्तरायण/ माघी/ संक्रांती), येथे 'संक्रांती' म्हणजे 'हस्तांतरण', हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो. हिंदू पंचांगानुसार तसेच ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे. लीप वर्षांमध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारीख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ती १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते. सूर्य या देवतेला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव, संपूर्ण भारतात आयोजित केले जातात.

भारत हा कृषीप्रधान देश आहे व त्यामुळे या भारत देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण-समारंभ साजरे केले जातात. मकरसंक्रांत शेती संबंधित महत्त्वाचा सामाजिक भारतीय सण आहे. मकर संक्रांती हा सण पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी देवाचे आभार मानण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी शेतीत वापरल्या जाणाऱ्या नांगर, कुदळ, बैल इत्यादींची पूजा केली जाते आणि शेतकऱ्यांवर देवाची कृपा सदैव राहावी यासाठी सूर्यदेवाची पूजा केली जाते. हा सण रंगीबेरंगी सजावट, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवणे आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरा केला जातो. दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात - जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६० ते १०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा आणि यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात, ही परंपरा चालू करण्याचे श्रेय आदि शंकराचार्यांना दिले जाते. हा दिवस खूप पवित्र समजला जातो. महाभारतात देखील उत्तरायणाचा संदर्भ असा दिला आहे की इच्छामरणी असलेल्या शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहांनी देखील सूर्याचे उत्तरायण चालू होताच देहत्याग केला होता.

मकर संक्रांतीशी संबंधित सण भारतातील अनेक राज्यात आणि भारताच्या शेजारच्या देशांमध्येही वेगवेगळ्या नावानी साजरा केला जातो. पश्चिम बंगालमध्ये त्याला मोकोर सोनक्रांती म्हणून ओळखले जाते आणि नेपाळमध्ये माघे संक्रांती, आसाममध्ये माघ बिहू, पंजाब मध्ये लोहरी, हिमाचल प्रदेशात माघी साजी, जम्मूमध्ये माघी संग्रांद किंवा उत्तरायण, हरियाणामध्ये सक्रत, राजस्थानमध्ये सकरत, मध्य भारतात सुकरात अशा विविध नावांनी हा सण साजरा करतात. तामिळनाडूमध्ये पोंगल, गुजरातमध्ये उत्तरायण, उत्तराखंडमध्ये घुघुटी, बिहारमध्ये दही चुरा, ओडिशामध्ये मकर संक्रांती, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, पश्चिम बंगालमध्ये पौष संक्रांती, उत्तर प्रदेशमध्ये खिचडी पर्व, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये संक्रांती देखील म्हणतात. तर, सोंगक्रान (थायलंड), थिंगयान (म्यानमार), मोहन सोंगक्रान (कंबोडिया), आणि शिशूर सेनक्राथ (काश्मीर) ह्या वेगवेगळ्या नावांनी हा सण साजरा केला जातो.

महाराष्ट्रात हा सण तीन दिवस साजरा करतात. यास भोगी (सामान्यतः १४ जाने), संक्रांत (सामान्यतः १५ जाने) व किंक्रांत (सामान्यतः १६ जाने) अशी नावे आहेत. भोगीच्या दिवशी लहान वांगी, बटाटा, हिरवे हरभरे, तुरीचे दाणे, वाल, गाजर, तीळ, खोवलेले खोबरं, मसाला वापरून भोगीची खास भाजी आणि सोबत मुगाच्या डाळीची खिचडी केली जाते. तर संक्रांतीस तीळ-गुळाचे लाडू, तिळाच्या वड्या, हलवा, गुळ-पोळी बनवून त्याचा देवाला नैवैद्य दाखवला जातो. या दिवसांमध्ये शेतात आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकींना हळदी-कुंकू लावून देतात. हरबरे, ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगड्यात भरून त्या देवाला अर्पण करतात. सुगड्यांची पूजा करतात. संक्रांतीस आप्तस्वकीयांना आणि मित्रमंडळींना आणि लहान मुलांना तिळगुळ (तिळाचे लाडू, वड्या किंवा तिळाचा हलवा) आणि स्त्रियांना वाण वाटून 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला' असे सांगून स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते. विवाहित स्त्रिया या दिवशी आणि या दिवसापासून रथसप्तमीपर्यंत कधीही हळदी-कुंकू करतात. मराठी स्त्रिया संक्रांतीच्या दिवशी आवर्जून काळी साडी नेसतात.



लग्नानंतर पहिल्या संक्रांत सणास मुलीला काळी साडी भेट दिली जाते. हलव्याचे दागिने मुलीला व जावयालाही देऊन त्यांची पहिली संक्रांत साजरी केली जाते. लहान बालकांनाही संक्रांतिनिमित्त काळ्या रंगाचे कपडे आणि हलव्याचे दागिने घालतात. चुरमुरे, बोरे, हरभरे, उसाचे तुकडे, हलवा, गोळ्या – चॉकलेट्स असे मिश्रण लहान मुलांच्या डोक्यावर ओतून त्यांना बोर-नहाण घालतात. ह्या कार्यक्रमास लूट लुटायला खास करून लहान मुलांना बोलावतात, ते त्याची मजा लुटतात. बालकांच्या वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत बोर-नहाण केले जाते.

भारताबाहेरच्या - अमेरिका, युरोप सारख्या देशांमध्ये तेथील स्थानिक महाराष्ट्र मंडळेही संक्रांतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा

करतात. हलव्याच्या दागिन्यांची तसेच पतंग बनवण्याची स्पर्धा, महिलांसाठी उखाणे स्पर्धा, मनोरंजनाचे कार्यक्रम तर कधी गरबा-दांडिया सारखे सामूहिक खेळ तसेच चविष्ट गुळ-पोळी, तिळगूळ - हलवा, संक्रांतीचे हळदी-कुंकू आणि वाण, लहान मुलांचे बोर-नहाणं असे ह्याचे सर्वसाधारण स्वरूप असते. गुळ-पोळी, भोगीची भाजी, खिचडी, तिळाची वडी आणि हलवा यासोबत मराठी कुटुंबे आपल्या घरी तसेच मित्रमंडळीं सोबत एकत्र येऊन संक्रांतीचा सण साजरा करतात.

मग, चला तर - आपापल्या घरी, तसेच महाराष्ट्र मंडळामध्ये आपले ठेवणीतले काळे कपडे परिधान करून आपल्या सख्या - मित्रांसोबत संक्रात साजरी करून आपणही तिचा आनंद द्विगुणित करू या! तिळगूळ घ्या, गोड गोड बोला!

- **शुभदा सावरगावकर,** हिल्सबोरो, न्यू जर्सी


ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## इंद्रधनुचा मार्ग

आज अवतरला इंद्रधनुचा
दिव्य मार्ग सातपदरांचा
क्षितिजावरच्या दोन गावांशी
जोडला वरती आकाशी
सप्तपदरी महामार्गी
पुष्पवृक्षावली सप्तरंगी
प्रत्येक पदरी लावलीत
फुलझाडे रांगेत रंगीत
तो करुन कुसुमशिंपण
गावांना देई क्षेमालिंगन
क्षितिजावरच्या त्या गावांचा
दुवा असे दिव्यलोकांचा
पुण्याईचे जीव हर्षमुखे
भोगतात तेथे स्वर्गसूखे
उरलेले मनी, पाहिलेले स्वप्नी
परमानंदानुभव घेती जीवनी
पंख फुटुन मुक्त उडावे
मन झाले मत्स्यवेगे पोहावे
असेच जीव वसलेत तेथे
हीनभावनेचा लवलेश न जेथे
तेजोमुख व काया ओजस्वी
निःस्वार्थ प्रेमसंपन्न असावी
बालहास्य आमचे गेलेले मरून
असेल तेथे आननी चिरतरुण
त्या दिव्य गावांना जावेसे वाटते
अनुभवावे, रहावेसे वाटते
इंद्रधनूच्या मार्गाने चलावे
आणि ओष्ठधनूचे युगुल हर्षावे.

**- ज्योत्स्ना काटकर नारनवरे,** केंडॉल पार्क, न्यू जर्सी



## अमूर्त

अलीकडेच एका चित्र प्रदर्शनाला गेलो होतो. माझी लेक आणि मी एक एक चित्र बघत त्याचा आस्वाद घेत होतो. एका चित्रापाशी थांबलो आणि विचार करू लागलो, यातून चित्रकाराला नक्की काय सांगायचंय? रेषा बोलक्या असतात पण आपली आणि त्या कलाकाराची पातळी एक असेल तर कदाचित् तो काय सांगू पाहतोय हे कळेल नाहीतर ही अमूर्त शैली असं म्हणून आपण पुढे निघून जाऊ.

मला काहीतरी वेगळच जाणवत होतं आणि माझ्या लेकीला आणखी काही. तिथेही बहुदा आपण काय अनुभव घेतलेत, आपल्या जाणिवा काय आहेत यातूनच आपण एखाद्या कलाकृतीचा अर्थ लावत असतो. मग लक्षात आलं ही अमूर्तता सगळीकडेच आहे!

एका सुप्रसिद्ध कवयित्रीच्या मुलाखतीत ऐकलं होतं की संगीतकार ला ला ला म्हणत चाल सांगतो आणि मग त्याबरहुकूम ती शब्द लिहिते. ही सुद्धा अमूर्तता नाही का?

शब्दांच्या बंधात न बसवता एखादी चाल त्याला सुचते आणि तो ती बांधतो. अशी चाल बांधताना कदाचित् त्याच्यासमोर फक्त एक प्रवाह असेल, निरंकुषपणे तो ती चाल बांधतो. मनातील अमूर्तता त्या चालीतून व्यक्त करतो. या उलट गीतकाराच्या सुद्धा फक्त चाल डोळ्यासमोर असते आणि त्याचे बोट धरून शब्द बांधले जातात आणि यामधे तो संगीतकाराच्या मनातील अमूर्तता शोधण्याचा प्रयत्न करतो.

कित्येक वेळा आपण याचा अनुभव घेतो. एखाद्या अथांग समुद्रावर जातो आणि ते विराट रूप पाहून मनात नक्की काय भावना येतात ते समजत नाही. त्या काहीशा अमूर्त स्वरूपातच असतात. हिरव्यागर्द वनराईने शोभून दिसणाऱ्या डोंगरमाथ्यावर पोहोचल्यावर असच काहीसं नि:शब्द व्हायला होतं. मनातल्या शांत भावनेला कदाचित् नाव देता येत नाही. हे अनेकानेक भावनांचे एक अव्यक्त स्वरूप असतं का? हिमाच्छादित डोंगर पाहून असंच काहीसं वाटतं. केवळ नि:शब्द! अमूर्ततेच्या जवळ जाणारं.

एखादी बी जेव्हा रुजते तेव्हा त्यातही उद्याचा संकल्प अमूर्त स्वरूपातच असतो. एवढ्याशा बीजाला पाहून थोडेच लक्षात येते की याचा महावृक्ष होणार आहे? त्या वृक्षाचे स्वप्न त्या बीमधे निराकार रूपात असते. पाणी, माती, सूर्यप्रकाश याच्या पोषणातून त्यातील तत्व साकार होत जाते.

माती सुद्धा अशीच अव्यक्त, निराकार पहुडलेली असते. एखाद्या कसबी कुंभाराचा संकल्प मात्र तिला मूर्त स्वरूपात आणतो.

सर्व सूर तसे पाहिले तर अमूर्तच! गायकाला तो स्वर मात्र त्याच्या प्रतिभेने दिसू लागतो. त्या स्वरांवर आंदोलन, कंपन, न्यास करत त्याच्या आतून ते सूर साकार होऊ लागतात, तो गाऊ लागतो आणि एक वेगळीच सृष्टी निर्माण होते. प्रत्येक गायकाच्या प्रतिभेतून तो स्वरसाज दरवेळी एक नवी सृष्टी उभी करतो.

कोणत्याही सृजनशील कलावंतांची कला अशीच अव्यक्त स्वरूपात असते. तिला प्रतिभेचे धुमारे फुटून ती काय स्वरूप घेईल हे कोणी इतर जाणू शकत नाही. कदाचित त्या कलाकारालासुद्धा ती जाणीव नसते.

तो जितका आपल्या कलेशी एकरूप होईल तितका तो अधिकाधिक व्यक्त होईल. साकार होईल. रसिकांना त्याच्या कलेचे दर्शन घडवू शकेल. अभिव्यक्ती आणि अमूर्तता याचा असा जवळचा संबंध आहे.

पूर्वीच्या ऋषीमुनींनी रचलेले ग्रंथ, विपुल साहित्यसंपदा अशीच अमूर्ततेशी एकरूप होऊन जन्माला आले असतील का? त्या अमूर्ततेशी संपर्क साधण्यासाठी ते अरण्यात किंवा गुहेत किंवा निरव ठिकाणी जात असतील का? नॉस्ट्रॅडॅमसला भविष्याविषयीच्या सर्व ओळी ट्रान्समधे असताना स्फुरल्या असं म्हणतात. गंमत अशी आहे यातलं काहीच दृष्टीस पडत नाही त्यामुळे फसगत होते. नक्की काय घडतं हे कळत नाही. सर्व गोष्टींचा सूक्ष्मपणे विचार केला तर थोडसं आकलन होऊ शकेल.

अमूर्तातून मूर्तात आणण्याचा हा शोध खरतर अनादी काळापासूनचाच नाही का? तसं पहायला गेलं तर तो प्रत्येक क्षेत्रात सामावलेला आहे. ऋषीमुनीच नव्हे तर आताचे रिसर्चर्स, सायंटीस्ट असाच शोध घेत नाहीत का? जे सापडलं नाहीये तेच शोधायच्या प्रयत्नात ते कायम मग्न असतात. म्हणूनच काहीसे आत्ममग्न. या धडपडीमुळेच नवनवीन शोध जन्माला येतात मग क्षेत्र कोणतही असो. हायब्रीड कार आली आता फ्लाईंग कार ही येऊ शकेल.

एखादा पदार्थ नाविन्यपूर्ण रूपात पाहण्यासाठी कोणी धडपड करतात तर कोणी मनात ठसलेलं चित्र साकार करण्यासाठी.

अमूर्तता म्हणजेच परमेश्वराचे निराकार तत्व असेल का? आपण जसे पाहू तशी सृष्टी निर्माण करणारं? अव्यक्तातून व्यक्त होणारं? आपल्या उरात अनेक बीजे घेऊन शांत पहुडलेलं? योग्य वेळ येताच साकार रूपात येणारं!? सामान्य माणसाला हे झेपत नाही मग त्या परमेश्वराला मूर्त साकार रूप देण्याची धडपड सुरू होते.

प्रत्येकाच्या आकलनाप्रमाणे एक मूर्तीस्वरूप तयार होते.

माणसाचं मन सुद्धा असच... अव्यक्त, निराकार पण अनेक संकल्पांची बीजं मनात दडवून असलेलं. यातली काही बीजे विषारी, विखारी सुद्धा असतात. आपण खतपाणी घालू तशी ती फलिभूत होतात, साकार होतात. कोणत्या बीजांना खतपाणी घालायचं, कोणत्या अमूर्ततेला व्यक्त स्वरूप द्यायचं हे तसं पहायला गेलं तर आपल्याच हातात आहे. पण आपण इतका विचार करतो का?

दिवसभरात कोणत्याही विचारांना थारा देतो. ते कसे व्यक्त झाले याच्या मुळाशी फारसे जात नाही. अजून आकलन न झालेल्या असंख्य गोष्टी सर्वत्र विखुरलेल्या असताना आपण नको त्याला खतपाणी घालून विषारी फळे वर काढत असतो. त्यापेक्षा सजग राहून या सर्वाकडे का पाहत नाही हा चिंतनाचा विषय आहे.

तूर्तास मी अल्पमतीने केलेले अमूर्ततेचे चिंतन इथेच थांबवते तुम्ही मात्र जरूर शोध घेत रहा.

- **शिल्पा कुलकर्णी**, लुईव्हील, केंटकी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## मिसळ आणि पाऊस

इकडे धरित्री तप्त झालेली असते
आणि इकडे कढई तप्त झालेली असते
मग सोसाट्याचा वारा आणि काळे ढग जमा होतात
इकडे पण तसेच जिन्नस जसे कांदा लसूण काळा मसाला जमा होतो
हळुहळु तप्त जमिनीवर पाण्याचे थेंब पडू लागतात
इकडे सगळे जिन्नस गरम कढईत पडू लागतात
आणि आसमंतात सुंदर असा मृदगंध पसरतो
तसा इकडे मिसळीच्या तर्रीचा सुगंध पसरू लागतो
आणि शेवटी पावसाने जसे डोळ्यामध्ये आनंदाश्रू येतात
तसेच मिसळीच्या पहिल्या घासला डोळ्यातून आनंदाश्रू येतात
मग समजायचं की पावसाने धरित्री आणि मिसळीने माणसाला ‘तृप्त’ केलंय!!!

- **योगेश पुराणिक**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## या वर्षी तरी मिळवणारच !

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी या वर्षी तरी मिळवणारच! आमचा आत्मा जर चुकून टिळकांच्या शरीरात गेला असता तर, प्रत्येक १ जानेवारीला आम्ही स्वराज्याची प्रतिज्ञा घेतली असती आणि १-२ महिन्यात त्याची वाट लावली असती आणि अशी प्रतिज्ञा घेतली आहे ह्याची आईवडिलांनी फेब्रुवारी मध्ये आठवण करून दिली असती! “या वर्षी तरी स्वराज्याचं काही झालं का नाही रे बाबा?” मग आम्ही कारणं देऊन, प्रश्न करणाऱ्यांवरच चिडलो असतो.

तसंच आम्ही जर शिवाजी महाराज असतो तर स्वराज्याची शपथ घ्यायला रायरेश्वरावर ३१ डिसेंबरला गेलो असतो. इथे पण तेच! या वर्षीतरी स्वराज्य मिळवणारच असं म्हणत म्हणत “छे, फार थंडी आहे बाबा गडावर” असं म्हणत चहाची टपरी नाही म्हणून रडरड केली असती.

माझ्या लहानपणी ‘धडपडणारी मुले’ असं एक पुस्तक होतं माझ्याकडे. परंतु ‘धडपडणारी’ हा शब्द का कुणास ठाऊक फोड करून दोन ओळींमध्ये लिहिला होता. ‘धड पडणारी मुले’ असा. कदाचित मुखपृष्ठावर एव्हढा शब्द आयत्यावेळी बसला नाही (प्रतिज्ञा घेऊन सुद्धा). पण मला कळायचं नाही, “पडतानासुद्धा धड पणे पडणारी” अशी ही धड पणे पडणारी मुलं आहेत का?

त्यामुळे नवीन वर्षाची सुरुवात जोरदार करायची असे मी ठरवतो. मग ती धडपडत का होईना सुरुवात तर होते, पण जेव्हा खरंच एखादी प्रतिज्ञा किंवा रिझोल्युशन बोंबलते तेव्हा मी कारणं देतो. म्हणजे जिममध्ये जाणं बंद झालं कारण पाय दुखावला, ऑफिसमधलं काम फारच वाढलं, मुलांच्या परीक्षा आल्या..वगैरे. मग मी दावा करतो. मी अगदी नाही जमलं तर चालायला जातोच, ते पण नाही जमलं तर घरातल्या घरात चालतोच. म्हणजे काय, धडपडलोच आहे तर पडताना सुद्धा कसे धड पणे पडलो हे इथे दाखवण्याचा प्रयत्नं! योग्य कारणाकरता पडलो, नाही तर पडलोच नसतो! अशी धडपणे पडण्याची कला मी लहानपणीच शिकलो आहे.

५ जानेवारीला (किंवा ४, ३, २) जिममध्ये, फेमस हायकिंग किंवा मॉर्निंग वॉक स्पॉटला धक्काबुक्की असते. या वर्षी नवीन भाषा शिकणार, या वर्षी हे वाद्य वाजवायला शिकणार, या वर्षी हे शिकणार, ते शिकणार, या वर्षी ६ पॅक कमवायचे, आठवड्यातून फक्त एक दिवस चिट डे, बाकी डाएटिंग! या वर्षी महिन्याला एवढे पैसे शिल्लक टाकायचेच! गाडीचं लोन फेडूनच टाकायचंच या वर्षी! व्यवस्थित गुंतवणूक करायची! स्टॉकमध्ये जोरदार उडी घ्यायची! या वर्षी

प्रमोशन मिळायलाच पाहिजे! महिन्यातून कमीत कमी एक का होईना पुस्तक वाचायचेच!



आम्ही अतिशय हेल्थी खाण्याचं ठरवतो, आणि दुसऱ्याच आठवड्यात गोल गोल पिझ्झाच्या चक्रात अडकतो. आम्ही पैसे वाचवायचे ठरवतो आणि नवीन आयफोनच्या सौदर्याच्या प्रेमात पडून 'भूल कोई हमसे ना हो जाये' करत कारण नसताना एका रात्रीत वाचवलेले पैसे घालवतो. आम्हाला नवीन भाषा शिकायची असते, पण फक्त त्या नवीन भाषेतले "हॅलो, येस आणि नो" या तीन शब्दांनंतर आमची बोलती बंद होते. आम्हाला एक महिन्यात एक तरी पुस्तक संपवायचे असते, पण भविष्यात वाचण्याच्या पुस्तकांची यादी एक महिन्यात ३ ने अधिक वाढते. थोडक्यात आम्ही एका महिन्यात -२ पुस्तके वाचतो.

हो, हल्लीचं हे एक नवीन फॅड आहे, सोशल मीडिया पासून लांब राहायचं! परंतु १-२ महिन्यातच whatsapp, facebook वर आमचं जुनं हरवलेलं प्रेम "सामने ये कौन आया दिल में हुई हलचल" करत हजर होतं आणि आम्ही पागल होऊन फोनमध्ये घुसतो. आम्ही ५ वाजता उठायचं ठरवतो, आणि पहाटे पहाटे कर्कश वाजणाऱ्या गजराच्या घड्याळाला किंवा फोनला कानफटात मारतो. आम्ही सगळं घर deep clean करायचं ठरवतो आणि आवरता आवरता सापडलेल्या जुन्या फोटोंमध्ये किंवा वस्तूंमध्ये हरवून जाऊन जास्त पसारा करतो.

माझा जन्म २५ जूनला. म्हणजे अगदी १ जानेवारीनंतर (almost) exactly सहा महिन्यानंतर. त्यामुळे माझ्या वर्षप्रतिज्ञा २ installment मध्ये मी करतो ! कारण वाढदिवस सुद्धा वैयक्तिक वर्षाची सुरुवातच ना! एकदम मोठ्या प्रतिज्ञा नको, तर दोन भाग करून घेतल्या की चांगला कंट्रोल राहतो. परंतु त्यामुळे प्रतिज्ञा-पतन वर्षातून दोनदा होते!

वर्षातून दोनदा तरी प्रवासाला जायचेच, असे म्हणेपर्यंत ६ पैकी ४ महिने इतके पटापट जातात की आता पुढच्या सहा महिन्यातले प्लॅन करू असं म्हणत अजून ४ महिने वाया जातात. Breaking bad habits ही प्रतिज्ञाच कशी break झाली याची कथा लहान मुलांना झोपताना विनोदी म्हणून सांगितली जाते. चालढकल करणे हे आमच्या रक्तात एवढे भिनले आहे की एखादी गोष्ट पुढच्या नवीन वर्षांपासून सुरु करू हे आम्ही केवळ लाजेने पहिल्या सहा महिन्यात म्हणत नाही.

तर असे आम्ही, सगळ्या प्रतिज्ञा बाजूला राहतात आणि "एक बार जो मैने कमिटमेंट कर दी, तो मैं अपने आप की भी नही सुनता" असे सलमान शाहरुखचे डायलॉग असलेले सिनेमे मात्र सहज जाताजाता नक्की बघून होतात.

निदान स्वतःला बेस्ट ऑफ लक तरी देऊ नेहेमीप्रमाणे! स्व-शुभेच्छा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि त्या मी (दरवर्षीप्रमाणे) या वर्षी पण मिळवणारच!

**- सुधीर धर्माधिकारी, सॅन होजे, कॅलिफोर्निया**

## पुस्तक परिचय

'गंधर्वांचे देणे' हे आगळे वेगळे पुस्तक एप्रिल २०२४ मध्ये प्रकाशित झाले. ग्रंथाली प्रकाशनाने त्याचा प्रकाशन सोहळा अतिशय देखणा असा केला आहे. तो 'यूट्यूब'वर बघितल्यानंतर ते पुस्तक हाती पडायला तीन महिने गेले. संपादन श्री अतुल देऊळगावकर यांनी केलं आहे. पुस्तक प्रसिद्ध करण्याकरता त्यांनी केलेले परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत. हा पुस्तक परिचय तसा उशिराच लिहिला गेला. आणि मुद्दामच त्याला मी 'परीक्षण' म्हणत नाही. कारण माझा तितका अभ्यास आणि अनुभव नाही. हा परिचय लिहिण्यामागची काही पार्श्वभूमी अशी.

१९७४ ते १९८५ ह्या काळात मी कुमारांच्या अनेक मैफिली ऐकल्या. 'कुमार भक्त' असं टोपण नाव असलेल्या ११/१२ व्यक्तींपैकी मी एक होतो. श्री. बाबुराव रेळे (कुमारांचे देवधर स्कूलमधील सहाध्यायी आणि स्वतः उत्तम गायक) हे आमचे म्होरके. त्यामुळे मुंबई-पुणे परिसरातील होणाऱ्या मैफिली ते आम्हाला कळवत. त्यामुळे कुमारांचे बहुतेक कार्यक्रम आम्हाला ऐकायला मिळाले. त्यात नेहमीच्या मैफिलीसह निर्गुणी भजन, ऋतू संगीत, तुलसी दर्शन, मला उमजलेले बालगंधर्व. कबीर, तुकाराम दर्शन, धून उमंग राग, माळवाकी लोकधुने, तांबे गीत रजनी, मल्हार दर्शन असे अपूर्व कार्यक्रम ऐकता आले.

१९८२ साली ग्रंथालीच्या वर्धापन दिनानिमित्त कुमारांची एक सुरेख मुलाखत श्रीमती वासंती मुझुमदार ह्यांनी माटुंग्याच्या पोतदार कॉलेज मध्ये घेतली होती. त्यात कुमारांचे गायनाबाबतचे विचार, त्यांची सृजनशीलता, आजारात झालेले चिंतन, हे सर्व ऐकून आम्ही सर्व दिङ्मूढ झालो होतो. प्रो.देवधरांबद्दल बोलताना सद्गदित झालेले कुमार त्यावेळी आम्ही पाहिले. वयाच्या १०/११ वर्षी मोठ्या मोठ्या

गायकांचे गाणे हुबेहूब गाणारा मुलगा इतका सर्जनशील होईल हे त्यावेळी वाटणं अशक्य होत. पण प्रो. देवधरांनी ह्या मुलाला स्वतःच्या मुलासारखं प्रेमानं  वाढवलं, त्याच्यावर गाण्याचे  संस्कार केले, सृजनतेला वाव देऊन नव्या विचारांना दिशा दिली. हे देवधरांचं ऋण कुमार वेळोवेळी प्रकटपणे सांगत. कुमारांनी त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला. पुढे झालेल्या  आजारात ७/८ वर्ष गाणं बंद पडलं पण, संगीतावर त्यांचं  विचारमंथन चालूच राहिलं. त्यातून झालेली निर्मिती काही अंशी आपण ह्या पुस्तकात अनुभवतो.

१९८५ मध्ये ग्रंथालीने कुमारांचे एक सहा दिवसांचे सत्र खास कार्यक्रमात आयोजित केले. त्यात कुमारांनी आपले विचार प्रकट केलेच पण ते सुस्पष्ट व्हावेत म्हणून त्यापैकी काही गाऊन दाखविले. उदघाटनाचा एक कार्यक्रम मला सुदैवाने बघता आला. उरलेले पाच मी बाहेरगावी  असल्याने चुकले. त्या कार्यक्रमाची ध्वनिफीत ऐकण्याचा एक कार्यक्रम पुण्यात झाला असे कळले. पण तोही चुकला. त्यामुळे त्याबद्दलची हुरहूर कित्येक वर्ष मनात सतत होती. ह्या पुस्तकाने ती काहीशी कमी झाली इतकंच.

आता ह्या पुस्तकाविषयी. श्री अतुल देऊळगावकरांनी जवळ जवळ ३२ वर्ष लुप्त झालेल्या ह्या सहा दिवसांच्या  कार्यक्रमांचं ध्वनिमुद्रण मिळवलं. त्यावर चांगले  ऐकता याव म्हणून संस्कार केले आणि त्याचं उत्कृष्ट संकलन, संपादन करून ते ग्रंथाली तर्फे प्रकाशित केल. त्याबद्दल सर्व गान प्रेमी त्यांचे ऋणी आहेत. सहा दिवसात संगीतातील सहा वेगळ्या पण एकमेकांशी निगडित असलेल्या विषयावर कुमारजींना बोलतं केल ते चार जाणत्या व्यक्तींनी. त्यात घेतलेले विषय आणि मुलाखतकार असे:

| | |
|---|---|
| **स्वर-लय-ताल** | **मंगेश पाडगांवकर** |
| **रागसंगीत** | **शरदचंद्र  चिरमुले** |
| **विविध गायनप्रकार आणि** | |
| **मला उमजलेले बालगंधर्व** | **श्रीराम पुजारी** |
| **संगीतातली घराणी** | **शरदचंद्र चिरमुले** |
| **लोकसंगीत आणि ऋतू संगीत** | **वसंत बापट** |
| **मी ऐकलेले आणि पाहिलेले गाणे** | **वसंत बापट** |

ह्या पुस्तकाचं वैशिष्ट्य असं की बहुतेक संकल्पना विशद करताना कुमारजींनी ते गाऊन दाखवलं आणि ह्या पुस्तकात ते क्यू आर कोडने समाविष्ट करण्यात आल्यानं आपल्याला ते सर्व ऐकता येतं. अशी ५३ क्यू आर कोड ह्या पुस्तकात आहेत.  त्यामुळे कुमारांचे विचार सुस्पष्ट व्हायला मदत होते. वासंती मुझुमदार ह्यांनी तयार केलेली प्रश्नावली आणि मुलाखतकारानी विचारलेले प्रश्न ह्यांना कुमारांनी अगदी विस्तृत उत्तरे दिली आहेत ती कुमारांच्या खास मराठीत. कानडी शब्द आणि शैली ह्यांचा प्रभाव असलेली आणि माळव्यातील हिंदीच आक्रमण झालेली मराठी ऐकताना थोडी गंमत वाटते. त्यांचे काही उदगार मित्रांच्या संवादात असावे असे आहेत त्यामुळे त्यातला औपचारिकपणा निघून जातो किंबहुना कमी होतो. श्री देऊळगावकरांनी आपल्या संपादनात कुमारांचे विचार, भाषा, व्याकरण, ह्यात कुठलाही बदल केलेला नसावा. त्यामुळे काही बोलणे साध्या संभाषणात असावं अस वाटतं. काही विचार अत्यंत मूलगामी आणि प्रथमदर्शनी प्रक्षोभक वाटतात. संगीतातील  घराण्यांबद्दल त्यांचे विचार  त्यावेळीसुद्धा बऱ्याच तज्ज्ञांना पटले नव्हते. 'तुकारामदर्शन' कार्यक्रमावर त्याकाळी खूप टीका झाली होती.  'मला उमजलेले बालगंधर्व' हा कार्यक्रम सुद्धा बऱ्याच तज्ज्ञांनी 'नाक मुरडून' ऐकलेला मी अनुभवला होता. त्याच्या बरेच आधी वाशी इथे दोन दिवसांचे त्यांचे विचारसत्र अनेकांच्या टीकेचा विषय झाले होते. 'तोंडी संमेलनात'  झालेला त्यांचा कार्यक्रम मात्र अनेकांनी वाखाणलेला होता. ह्या सर्वांबद्दल कुमारजींनी आपली मते काहीशी पुसटपणे ह्या सत्रात सांगितली आहेत. पुस्तकाला लाभलेली पंडित सुरेश तळवलकर ह्यांची प्रस्तावना हा 'समीक्षा कशी करावी' ह्याचा गृहपाठ म्हणायला हरकत नसावी. कुमारांच्या गाण्याची आणि विचारांची प्रेरणा अगदी मोजक्या शब्दात त्यांनी अचूकपणे मांडली आहे. तसेच मंगेश पाडगावकरांचं उदघाटनाचे भाषण वाचताना, त्यांचा नर्म विनोद आपल्याला स्तिमित करतो.

श्री. अतुल देऊळगावकरांनी आपलं मनोगत प्रगट करताना काही वेगळे विचार मांडले आहेत. त्यात त्यांनी ५/६  शास्त्रज्ञ आणि तत्ववेते तसेच सत्यजित रे सारखे ख्यातनाम दिग्दर्शक ह्यांची विचारप्रणाली आणि काही बाबतीत कुमारजींचं त्या विचारांशी असलेले साम्य विचारपूर्वक मांडलं आहे. तसेच संगीताबद्दल बदलत्या विचारांचा मागोवा अतिशय सखोलपणे घेतला आहे. पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य असं की कुमारांच्या जन्मापासून (१९२४) ते अखेरचा श्वास घेईपर्यंत (१९९२) ह्या कालखंडात, कलाक्षेत्रात आणि काही अंशी राजकीय क्षेत्रात घडलेल्या प्रमुख घटना, ह्यांचा गोषवारा शेवटी 'कलावृत्त' ह्या शीर्षकाखाली दिला आहे. संगीत ह्या विषयावरील सिद्ध झालेल्या अनेक पुस्तकांपैकी त्याचे एक आगळे वैशिष्ट्य मानावे लागेल.

पुस्तकाची छपाई, त्यातली छायाचित्र आणि एकूणच बांधणी अतिशय आकर्षक झाली आहे. संगीतप्रेमींना घ्यावेसे वाटेल असे हे पुस्तक. श्री, देऊळगावकर आणि ग्रंथाली ह्या दोघांचे रसिक ऋणी आहेत. पुन्हा पुन्हा वाचावे आणि संग्रही जपून ठेवावे असे हे आगळे वेगळे  पुस्तक !

- **आनंद बर्वे**, शेवी चेस, मेरीलँड

## आताशा..चैनच पडत नाही....

आताशा
मनातलं शेअर केल्याशिवाय
चैनच पडत नाही......
घरात इनमिन दोघेजण..
वॉट्सअॅप ग्रूपवर हजारभर
आमच्या मनीला पिल्लं झाली ते,
मग इतक्या जणांना सांगायलाच हवे ना..
आताशा वॉट्सअॅपवर पोस्ट केल्याशिवाय
चैनच पडत नाही...
नवीन साडी सेल मध्ये घेतली
'गुलाबी साडी'चे रिल करायलाच लागले..
आताशा इंस्टावर ते टाकल्याशिवाय
चैनच पडत नाही...
गुलाबाला कळ्या आल्यापासून
फुलं येईपर्यंत काढलेले फोटो
आताशा फेसबूकवर शेअर केल्याशिवाय..
चैनच पडत नाही...
कोणी काही म्हणोत बापडी..
आताशा फोनमधले लाईक्स, आणि
कॉमेंट्स पाहिल्याशिवाय
झोपच येत नाही...
आताशा मनातले शेअर केल्याशिवाय..
चैनच पडत नाही....

- **चित्रा जुवेकर - मेहेंदळे,** सिॲटल, वॉशिंग्टन

## भगवद्गीता - अनमोल तत्वज्ञान

जीवनाच्या युद्धभूमीवर विजयी होण्याचा दिव्य मार्ग दाखवणारी श्रीमद्भगवद्गीता, श्रीकृष्णाच्या मुखातून सांगितलेली अमृतवाणी !

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ (गीता १८.७८)**

जेथे योगेश्वर भगवान श्रीकृष्ण आहेत आणि अर्जुन आहे, तेथेच श्री, विजय, विभूती आणि अचल नीती आहे. त्यामुळेच ही अमृतवाणी आपल्या जीवनातील अनेक छोटे आणि मोठे संघर्ष कमी करू शकते अशी ग्वाही श्रीमद्भगवद्गीतेच्या शेवटी संजय आपल्याला देत आहे.

गीतेचे वैशिष्ट्य हे आहे की ती युद्धभूमीवर सांगितली गेली. धर्म आणि अधर्म यांच्यातील हा संघर्ष प्रत्येक मनुष्याच्या जीवनात चालू असतो. आपले शरीर हे धर्मक्षेत्र आहे, जिथे पांडव (धर्माने चालणारे) आणि कौरव (अधर्माकडे नेणारे) या दोन विचारप्रवृत्ती सतत संघर्षरत असतात. कठीण प्रसंगी योग्य निर्णय घेण्याची दिशा गीता दाखवते. अर्जुनाप्रमाणे आपणही अनेकदा मोहग्रस्त होतो, शोकाकूल होतो. या संघर्षमय जीवनातून मार्ग काढण्याचा उपाय गीतेच्या उपदेशातून मिळतो. मनुष्य म्हणून जन्माला आल्यावर या जन्माचे सार्थक करून घ्यायचे असेल तर श्रीमद्भगवद्गीतेसारखा उत्तम ग्रंथ नाही.

**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् |**
**भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् || (गीता १२.७)**

**अर्थः** हे अर्जुना! त्या माझ्यात चित्त गुंतवलेल्या प्रेमी भक्तांचा मी तात्काळ मृत्युरूप संसार सागरातून उद्धार करणारा होतो.
उद्धाराचे विविध मार्ग, भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये सांगितले आहेत. प्रत्येक मार्ग हा व्यक्तीच्या स्वभावानुसार आणि क्षमतेनुसार आहे.

**कर्मयोग** - कर्मयोगात निष्काम कर्माची शिकवण आहे. ती शिकवण व्यावसायिक जीवनात मार्गदर्शक ठरते.

**ज्ञानयोग** - ज्ञानयोगातून आत्मज्ञान आणि परमार्थाचे ज्ञान प्राप्त होते. त्यातून जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

**ध्यानयोग** - ध्यानयोगातून मनाची एकाग्रता साधली जाते. त्याच्या माध्यमातून तणाव व्यवस्थापन शक्य होते.

**भक्तियोग** - भक्तियोगात भगवंतावर प्रेम आणि समर्पण भाव असतो. त्यामुळे भावनिक स्थैर्य प्राप्त होते.

या सर्व मार्गांचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती आहे. जसे एका वृक्षाच्या मुळापासून अनेक फांद्या निघतात, तसेच या विविध मार्गांचे मूळ एकच आहे - आत्मज्ञान

आधुनिक जीवनातील गीतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आजच्या धकाधकीच्या जगात माणूस तणावग्रस्त, चिंताग्रस्त आणि नैराश्यग्रस्त होत चालला आहे. स्पर्धात्मक वातावरण, कौटुंबिक जबाबदाऱ्या, कार्यालयीन दबाव, आर्थिक चिंता यांमुळे मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. अशा परिस्थितीत गीता एक दिशादर्शक म्हणून काम करते.

आधुनिक विज्ञानही गीतेतील तत्त्वांची सत्यता सिद्ध करत आहे. ध्यान आणि योगाचे मानवी मेंदू आणि शरीरावर होणारे

सकारात्मक परिणाम संशोधनातून दिसून येत आहेत. स्ट्रेस मॅनेजमेंट, इमोशनल इंटेलिजन्स, लीडरशिप या क्षेत्रांतही गीतेची तत्त्वे उपयुक्त ठरत आहेत.

गीतेत सांगितलेले हे ज्ञान सर्व मानवजातीसाठी आहे. धर्म, पंथ, देश यांच्या सीमा ओलांडून गीतेचे तत्त्वज्ञान सर्वांना मार्गदर्शक ठरते कारण मानवी जीवनातील मूलभूत प्रश्न आणि आव्हाने सर्वत्र सारखीच असतात. राग, लोभ, मोह, अहंकार या विकारांशी झगडणे, कर्तव्य आणि अकर्तव्य यांची निवड करणे, जीवनाचा अर्थ शोधणे - हे प्रश्न सार्वकालिक आणि सार्वत्रिक आहेत.

म्हणूनच गीता ही केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवन जगण्याचे मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे. ती आपल्याला शिकवते की जीवनातील प्रत्येक क्षण हा योग साधनेचा क्षण आहे. प्रत्येक कृती, विचार आणि भावना यांच्याद्वारे आपण आत्मज्ञानाच्या दिशेने प्रगती करू शकतो. गीतेचे हे चिरंतन ज्ञान आजच्या आधुनिक जगातही तितकेच प्रस्तुत आहे, कारण ती मानवी जीवनाच्या मूलभूत सत्यांशी जोडलेली आहे.

प. पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराजांनी सुरू केलेल्या गीता परिवारातर्फे कोविड काळात भगवद्गीता शिकवण्यासाठी ऑनलाइन संथा वर्ग सुरू करण्यात आले. ते पूर्णपणे विनामूल्य चालवले जातात. या उपक्रमाचा व्याप आज जागतिक पातळीवर पोहोचला आहे. १३ भाषांमधून, भारतीय वेळेप्रमाणे सकाळी ४ ते रात्री २ या वेळेत झूमच्या माध्यमातून हे वर्ग घेतले जातात. जगभरातील स्वयंसेवक हे काम करतात आणि साधकही जगभरातून शिकण्यासाठी येतात.

मी स्वतः २०२१ मध्ये या ऑनलाइन वर्गांमध्ये सहभागी होऊन गीतेच्या १८ अध्यायांचे शास्त्रोक्त उच्चारण शिकले. शनिवार व रविवारी होणाऱ्या विवेचन सत्रांतून अर्थ समजून घेतला. चार स्तरांच्या प्रशिक्षणानंतर परीक्षा देऊन प्रशिक्षक बनले. या अभ्यासाचा परिणाम म्हणून माझ्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक सकारात्मक बदल दिसून आले - रागीटपणा कमी झाला, मानसिक शांती वाढली, झोपेची गुणवत्ता सुधारली, वाचा सुधारली, आणि परमेश्वराबद्दलचा भक्तिभाव वाढून जगातील हवे-नको-पणा कमी झाला. मला स्वतःला देखील शांत झोप लागणे, मन प्रसन्न राहणे, काम करण्याची क्षमता वाढणे हे सकारात्मक बदल दिसून आले. अशी अनमोल गीता शिकण्यासाठी आजच learngeeta.com या वेबसाईट वर जाऊन रजिस्टर करा. गीता शिका व अर्थ समजून घेऊन त्यातील अमूल्य विचार जीवनात आणून सुखी, समाधानी व आनंदी व्हा.

जय श्रीकृष्ण ।

- **अश्विनी बेल्हे**, हिल्सबोरो, न्यू जर्सी

## तिळगुळाची संक्रांत

सर्वांना संक्रांतीच्या गोड गोड शुभेच्छा! हलक्या फुलक्या तिळगुळाचा प्रवास तुम्हाला आणि तुमच्या बच्चे कंपनीला आवडतोय का नक्की सांगा!

तिळागुळाची वडी निघाली अमेरिकेच्या सफरीला
चला तयारी करू म्हणाली मिळून दादा वहिनीला
पदर खोचून वाण्याकडे गेली घेऊन पिशव्या दहा
सुट्टे पैसे नाहीत म्हणता घेतले खोवून नारळ सहा
मणभर तीळ गुळाच्या ढेपा एकावर एक ठेवून पाहा
तेला तुपाच्या धावत्या खेपा शेंगांची पोती शिवून ठेवा
दोन चार कढया हलवायाच्या लोखंडाच्या घेऊन या
उलथण्याला हवीच धार परतायाला नेवूया
खमंग वासाच्या ओढीने सुटेल तेल खोबऱ्याला
तिळागुळाची वडी निघाली अमेरिकेच्या सफरीला
ताटावरती थापून लोणी सारण चमचम तजेलदार
नारळा तिळा बरोबरीने दाण्याचा कूट चविष्ट फार
दाटीवाटीने नाजूक सुरीने तयार झाल्या वड्या हजार
उड्डाणाच्या वेगाने सरसावून बसल्या कशा हुश्शार
नव्या दिशेला नव्या हाकेला नव्या उबेची नवी बहार
प्रवासातल्या शिणेस केले एकजुटीने हद्दपार
पार समुद्रा साता येता कडाडून भरली थंडी
वडी तिळाची मऊसूत की उडालीच घाबरगुंडी
सण संक्रातीचा येता मंडळात आल्या भगिनी
तिळागुळाच्या वड्या स्वागता उभ्या पैठण्या नेसूनी
गुलाबदाण्या अत्तरदाण्या सुगंधात न्हाती नाती
वाण सुगीचे मनोमनीने गोडव्याचे ओवू मोती
तिळागुळाचा रुबाब बघण्या मराठमोळे बाणेदार
गोड बोलुनी वडी रोवते झेंडा तिचाच अटकेपार

- **प्रिया गोडबोले**



We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.




***Manuel Antonio, Costa Rica***

**Artist: Neelima Gune - Gole**
Dimension: 24″ x 18″
Medium:Acrylic on Canvas
Price : $450
Mandal:MMJAX




***white bloom***

**Artist: Priya Kulkarni-Moghe**
Dimension: 10″x 8″
Medium:Acrylic Painting
Price :Not for Sale
Mandal:



***Rustling Leaves, Golden Dreams***

**Artist: Kirti Tannu**
Dimensions: 12″ x 18″
Medium: Watercolor
Price: $115
Mandal: MM Milwaukee




***Basket***

**Artist: Chitra Juvekar - Mehendale**
Dimensions:12″x16″
Medium: Acrylic Painting
Price: Not for Sale
Mandal: Seattle MM



***Blue Horse***

**Artist: Sangeeta Bhisey**
Dimensions:24″x24″
Medium: Acrylic Painting
Price: $275
Mandal: Marathi Vishwa, NJ



***Blooming in adversities***

**Artist: Medha Atre-Kulkarni**
Dimensions:8″ x 10″
Medium: Watercolor
Price:$200
Mandal: Marathi Vishwa, NJ

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org

Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists

*Buyer is responsible for shipping and handling.

## BMM TOWN HALL Meeting #2

**Saturday, November 16th, 2024, Meeting #2**
**Agenda:**
- Tribute to Jagdish Vasudev.
- Congratulating Santosh Salvi.
- Congratulating Shri Thanedar.
- Financials.
- India Programming.
- Uttarang.
- Reshimgathi.
- Marathi Shala.
- Yuwa
- B-Connect.
- Community Outreach.
- Vrutta Update.
- Convention Update.
- Maitree Melawa Update.
- Election Reforms.
- New Initiatives.
- Other Updates.
- Q&A.

===========================================

**Minutes/Meeting notes**

**Attendees:** BMM EC, BMM BOT, BMM Reps, Mandal Presidents, Election candidates & Volunteers

1. Welcome/Presidents Opening remarks (Prasad P)

Prasad welcomed everyone to the 2nd Town Hall meeting on behalf of BMM EC 24-26.

Prasad quickly reminded everyone about the 1st Town hall meeting and also thanked all the EC Committee as well as all the volunteers supporting BMM Initiatives for their valuable contributions and support. Also asked for feedback to improvise the same.

Prasad started the meeting in memory of Shri Jagdish Vasudev (Past BMM President) who had recently passed away.

Also, he congratulated the winners of recent elections:

- Shri Thanedar (past BMM president and BOT) for getting re-elected as a US Representative from Michigan, and
- Santosh Salvi (current BMM Treasurer) for becoming a New Hampshire State Representative.

Prasad handed over to Santosh for Financial review (separate report will be published), Santosh thanked previous EC for doing amazing work and surplus achieved ($75k+) by the end of their 2 years term through various Initiatives and congratulated Sandeep Dixit & his team.

**2. Updates from BMM Initiatives**

**India Programming:** Puru T. updated about current status and upcoming programs

Upcoming Movies: (Proposals Received)

Sambhaji Maharaj | Gulabi

Upcoming Natak: Jar Tar chi Goshta.

Upcoming Musical program: Swapneel Bandodkar.

**Uttarang:** Prasad updated about the initiative,

From August 2024, discussions on various topics through Zoom have been conducted.

Swara Sanjeevani: Raga, Taal & Health | "बाई माझी करंगळी मोडली" - Osteoporosis, a Silent Disease | Known & Unknown: Ahilyabai Holkar | Brain Boost - Tips for Mental Agility in Your Golden Years | Nakshatra Prabha - A tribute to the song composed by Srinivas Khale | Swar Sanjeevani second session | "खारीचा वाटा" - Repayment of Social Debt|

*Future Proposals:* Review of projects implemented for senior citizens in each Mandals and suggestions and assistance accordingly.

**ReshimGathi:** A project initiated to help Marathi boys and girls born and raised in America, as well as those who have come to North America for education or work, find partners, considering the needs of time and society.

After August 2024, approximately 100 new individuals have registered on the website.

A new updated version of the ReshimGathi website will be published in January 2025.

At least 5 get-togethers will be organized next year to facilitate in-person meetings.

If any Mandal is interested in organizing these meetings, please do not hesitate to reach out to Medhatai Godbole.

**Marathi Shala:** Rahul D updated current status and upcoming programs about Marathi Shala, Balak Palak & Yuwa.

Washington DC Shala update: Conducted many initiatives like: Atharvasheersha, Letter writing to Aaji-Ajoba. Killa competition, Ganapati making workshop.

Conducted Information session regarding Bal Bharati exams.

Started an online school for kids that do not have a Marathi shala in their town.

**Yuwa:** Started planning for the Summer Internship.

**B Connect:** Prasad P updated status & ongoing programs through B-Connect.

*What has been accomplished till now:* Kick off Session with Dr R.A. Mashelkar Sir

Anatomy of a Startup - Session -1 Sudhir Kadam

Break to Breakthrough – Ms. Swati Vora

*Next upcoming sessions*

Entrepreneurial Success Starts at self: Session 2 – Anatomy of a Startup – November 25th

Corporate Kirtan – Sameer Limaye – In talks (Mid - December)

**Outreach:** Gaurav Patwardhan updated status on Outreach and few new initiatives.

*Classic Initiatives are doing well and being conducted regularly:* Paurohitya | Meditation & Self Care | Karaoke | Philosophy | Classical Music (Mahesh Kale) | Cricket Tournament.

**New Initiatives:** Astrology | Sanskrit | Marathi Boli Bhasha | Sugam Sangeet (Aniruddha Joshi)

**Vrutta:** Anita Kant current Editor updated status regarding Vrutta.

Diwali Ank was published on time.

Diwali Ank (paper copies) were distributed to 25 Public Libraries in Maharashtra.

Starting Jan 2025, increase in price of a paper copy - From $25/year to $75/year

This is to cover the losses incurred for higher printing costs.

**BMM Convention Updates:** We have signed the contract with Seattle Convention Center and Sheraton Hotel.

Kick-off meeting was conducted in Seattle on Oct 19, 2024.

Various teams have been formed.

175 volunteers have been signed up so far.

Convention website has been launched.

Mohit is currently meeting artists/sponsors during his India trip.

Sponsorship packages will be announced in Jan.

**BMM Maitri Melawa Updates:**

*Dallas Maitree Melawa:* Shamli Anaspure was present and gave updates on current status

Date: Apr 19-20, 2025.

The Convention Center has been booked.

Maitree Melawa Core Team has been formed.

Some planning work has been started.

*Northeast Ohio Maitree Melawa:* Tanmayee Dixit (conveyor) was present and gave updates

Date: Jun 13-15, 2025.

Maitree Melawa Core Team has been formed.

Cleveland will be celebrating 50 yrs of mandal establishment in 2025.

Prasad P updated about Election reforms & some new initiatives as well

**Election Reforms:** An independent committee has been formed. The 4-member committee has one BMM Representative from:

Small size Mandal | Medium size Mandal

Large size Mandal | Canadian Mandal

Discussions are work in progress.

ETC: Feb 2025.

**BMM New Initiatives:**

**Social Cause:** Encouraging Mandals to promote a social cause.

**Indian Cultural Program:** (along with Shala) Kids will learn about Shivaji Maharaj, Peshve, Great freedom fighters, social reformers, artists, athletes, Indian festivals, Ramayan, Mahabharat, etc.

**Maharashtra Cultural Tour: (Dec 27-29)** : This 3-day tour will take you to historical places near Pune (Shivneri, Sinhagad, Lal-Mahal, Shaniwar Wada, Shiv Srushti, etc.) and Mumbai (Mantralaya, Elephanta Caves, Gateway of India, etc.).

Prasad also updated on the visit to New York and meeting with our prime minister shri Narendra Modiji with short conversation, invitation for BMM convention in Seattle and a Photo with him with BMM EC & BOT who were visiting. (Narendra K, Sulil S, Prasad P, Rahul D & Puru T.)

**3. QA's/Discussions**

Milind P from Orlando mentioned and asked to do something for a local Musical North America program- Narendra K updated about the form to fill out respective forms and also encouraged everyone to share any ideas for same

Vilas S raised a question about money raised during "Education summit" MV BMM convention 2022 in New Jersey and outstanding refunds to Univ of Mumbai, all the info/documents/evidence have been submitted to then existing committee (Vidya J. Amar U. & Sandeep D, Ajit N, teams) - Rajan P who was present in the meeting being part of the original discussion, mentioned that supporting documents still need to be reviewed and suggested the current BMM EC to review and make a decision. Prasad P assured to follow up and have a meeting with Vilas S offline to understand the same & come up with some resolution.

Shamli A raised a question regarding selection of Zonal coordinator for Shala - Rahul D mentioned due to the vast scope of work and to divide the work Shala created zonal team leads for better reach & Support to individual shala's.

Anita K raised a question regarding scholarship for needy/deserving students and in dire need of financial support to continue the program/student endowment fund which was started by the last committee (Sandeep D team) - Prasad P & Narendra K mentioned about the program existence in 2022, also will follow up and as needed. Santosh S also mentioned having robust policies related to these scholarships.

Sunil S mentioned about established categories of merit based & needy students with supporting individual metrics in selecting deserved students for both categories, these needs to be reviewed and recommenced. Rajan P also mentioned this was done in 2022 and 10 students received $1k each towards the same.

Marathi Boli Bhasha info was asked, Prasad asked to visit BMM website for more details. Marathi is for Conversational help for those who have missed learning Marathi during childhood and anyone from united states or other country or having different mother tongue as well.

Manjusha N requested to spread information within mandals to utilize all these initiatives, Prasad P encouraged all to visit BMM website for more information or details.

Milind P also raised concern about spreading info within mandals which should not be overbearing for both mandals & BMM Reps as Mandal also strives to spread awareness about local mandal programs to the respective members continuously.

Vilas S raised concerns about members selection for election reforms about only BMM rep being part of the team Vs any other volunteers- Prasad P assured transparency and BMM rep being the official link between mandal and BMM.

4. **Closing remarks** : Prasad P & Narendra K. thanked everyone for attending & having a good Town Hall meeting. Prasd wished everyone Happy Thanksgiving and safe holiday to those who are travelling.

Narendra K. reminded everyone to visit BMM website for all the information related to initiatives and also to fill related initiatives forms and information for different volunteering opportunities.